मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ९४ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ जून २०१३

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार

हितगुज जून २०१३चा अंक विलंबाने प्रकाशित होत आहे म्हणून क्षमस्व. यापुढे २०००रु. वाढीव वर्गणी जे देतील त्याच कुलबांधवांना 'हितगुज'चा अंक पाठविला जाईल. 'हितगुज' वाचण्यात, आपल्या घरी येण्यात ज्यांना 'स्वारस्य' आहे अशा कुलबांधवांनी २००० रु. वर्गणी पाठवली आहे त्या सर्वांचे अभिनंदन आणि त्यांना खुप खूप धन्यवाद!

आपल्या कुलबांधवांनी चांगला प्रतिसाद दिल्यामुळे 'हितगुज' प्रकाशित करण्याचा उत्साह वाढला आहे 'हितगुज' आपल्या सर्व परिवाराचे आहे त्याला आर्थिक बळ देऊन त्यासाठी पाठिंबा देणे, सहकार्य करणे हे आवश्यक व महत्त्वाचे वाटते. आर्थिक समृद्धी इतकीच सांस्कृतिक समृद्धीचीही समाजाला गरज असते. 'हितगुज'च्या माध्यमातून सांस्कृतिक समृद्धी वाढविण्याच्या मराठे प्रतिष्ठान प्रयत्न करीत आहे. समाजातील वातावरण बदलले असून समाजातील सर्व घटकांना असुरक्षित वाटत आहे. हताश झाल्यासारखे वाटत आहे अशा वेळी आपण चांगल्या मूल्यांचे जतन करून, सद्‌विचारांचं संवर्धन, पोषण आणि आदर्श संस्कारांचं पालन करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. कुणाच्या शब्दावर विश्वास ठेवावा, हे कळू नये अशी आज परिस्थिती आहे. 'माझ्या शब्दावर विश्वास ठेवा, दगाफटका होणार नाही' असं वाटायला लावणारं साहित्य आपण रचायला हवं. ते बळ हितगुजमधून प्रकाशित होणाऱ्या साहित्यातून आपणास मिळायला हवं, ज्या योगे येणारी नवीन पिढी ही प्रगतीपथावर घोडदौड करून आपल्या कुटुंबाचे, समाजाचे भले करून, कल्याण करून आपल्या राष्ट्राला उन्नतीमय करेल असो.

या अंकात वार्षिक अहवाल, आय-व्यय, हिशेबपत्र-ताळेबंद दिला आहे. किचकट आणि कष्टाचे काम दरवर्षीप्रमाणेच चार्टड अकौटंट श्री. प्रभाकर दामोदर मराठे यांनी पार पाडले आहे.

### ✻ जाहीर निमंत्रण ✻

**मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा**

रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१३ सकाळी १०.०० वाजता **स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे सभागृह,** १ला मजला, २५२, स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी उद्यान, दादर (प.), मुंबई ४०० ०२८. दूरध्वनी : ०२२-२४४६५८७७ येथे आयोजित केली आहे. सर्व कुलबांधवांनी आवर्जून उपस्थित राहावे ही आग्रहाची विनंती.

दिनांक ११ ऑगस्टला सकाळी १०.०० वाजता दादर येथील 'स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारका'च्या सभागृहात वार्षिक सर्व-साधारण सभा व गुणवत्ता पारितोषिके देण्याचा कार्यक्रम आहे. मराठे परिवारातील हुशार व गुणवान विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी मोठ्या संख्येने आपण सर्वांनी आवर्जून यावे. आपली उपस्थिती ही कार्यक्रमाची शोभा वाढविणारी असते.

'हितगुज' विषयी आपली मते, सूचना अवश्य कळवाव्यात म्हणजे त्यामध्ये काही सुधारणा केल्या जातील.

आपली शुभचिंतक

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**

(पृ.१२०)

८/१३ सहकार नगर, वडाळा,
मुंबई, ४०००८९०३१
फोन ०२२-२४१५०
२५ मे २०१३

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई-४०००३१ ◉
दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

Marathe Pratishthan

# गोमंतक मराठे परिवार संमेलन २०१३ थाटात साजरे

गोमंतक मराठे परिवाराचे २०१३ सालचे संमेलन १९ एप्रिल २०१३ रोजी श्री. सुहास दत्तात्रय मराठे यांच्या निवासस्थानी पर्ये-मठ, साखळी येथे थाटात पार पडले.

सौ. तृप्ती सुहास व सुहास दत्तात्रेय यांनी आपल्या आईवडिलांच्या मदतीने संमेलनाची तयारी उत्तम ठेवली होती. सकाळी ९ वाजल्यापासूनच कुलबांधव सभासदांनी हजेरी लावण्यास सुरुवात केली. सकाळी ११.०० वाजता प्रमुख पाहुणे श्री. गोविंद काळे, अध्यक्ष कृष्णा काशिनाथ मराठे व इतर मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. व्यासपीठावर श्री. काळे यांच्यासह अध्यक्ष, कार्यवाह प्रदीप अनंत तसेच स्वागताध्यक्ष सुहास दत्तात्रय हे उपस्थित होते. कु. अवधूत वामन याने श्लोक सादर केले. सुरुवातीला सर्व ज्ञात-अज्ञात सभासदांना एक मिनिट शांतता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली. सुहास दत्तात्रय यांनी सर्वांचे स्वागत केले. कार्यवाह श्री. प्रदीप अनंत यांनी मागील वर्षाचा अहवाल तसेच जमाखर्च सादर केला. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. गोविंद काळे यांनी आपले भाषण सादर केले. श्री. काळे यांनी आपल्या भाषणात ब्राह्मण समाज हा सभोवतालच्या समाजाच्या विकासासाठी किती महत्त्वपूर्ण आहे यावर विशेष भर देऊन ब्राह्मण हेच समाजात परिवर्तन करू शकतात असे सांगितले. ब्राह्मण समाजामुळेच आज आपली संस्कृती टिकून आहे म्हणून ब्राह्मणांनी आपले कर्मकांड व संस्कृती कधीच सोडू नये असे आवाहन केले. श्री. काळे यांनी स्वत: बार्शी सोलापूर येथे शिकत असताना त्यांचे एक शिक्षक श्री. विष्णुपंत नरसू मराठे यांच्या सहवासाचा विशेष उल्लेख केला व त्यांचे विशेष संस्कार आपल्यावर झाल्यामुळेच आपण आज असे घडल्याचे सांगितले. विशेषत: तरुणांनीच आपली संस्कृती राखण्याचे काम करायचे आहे असे आवर्जून सांगितले. कार्यक्रमात नंतर अध्यक्ष श्री. कृष्णा काशिनाथ यांनी आपले विचार मांडले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वीणा वामन यांनी केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर खुल्या चर्चासत्राला प्रारंभ झाला. यात प्रामुख्याने गोव्यात मराठे भवन उभारण्याविषयी विशेष चर्चा झाली व गोमांतक मराठे परिवाराने स्वबळावर अशी इमारत उभी करावी असा निर्धार व्यक्त करण्यात आला व त्या अनुषंगाने विशेष प्रयत्न करावे व आवश्यक निधी उभारावा असा ठराव घेण्यात आला.

यानंतर हितगुजच्या आवाहनानुसार गोव्यातील सर्व सभासदांनी हितगुजसाठी वाढीव रक्कम पाठवावी व हितगुज वाचवावे असा ठराव संमत करण्यात आला, तसेच हितगुजमधील लेखामध्ये नावाचा उल्लेख करताना प्रत्येकवेळी आडनाव न वापरता त्याऐवजी नाव, वडिलांचे नाव व पृष्ठक्रमांक नमूद करण्याचे आवाहन हितगुजला करावे असा ठराव संमत करण्यात आला.

नंतर डॉक्टरेट मिळालेल्या एक सभासद सौ. अपूर्वा अरुण, फोंडा यांचे एका ठरावातून अभिनंदन करण्यात आले.

चर्चासत्रात कृष्णा काशिनाथ, अरुण शिवराम, दीपक प्रभाकर, प्रदीप अनंत, वसंत विष्णू, पूजा विष्णू, गणेश शंकर व इतर सभासदांनी भाग घेतला. याप्रमाणे, इतरही अनेक विषयांवर चर्चा होऊन चर्चासत्र संपवण्यात आले.

दुपारच्या स्नेहभोजनानंतर लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला यात कु. अवधूत वामन, कु. वेद विष्णू व इतर लहान मुलांनी भाग घेतला.

समारोपाच्या कार्यक्रमात सभासदांनी आपले मनोगत व्यक्त केले व नंतर उपाध्यक्ष श्री. वसंत विष्णू यांनी सबंध कार्यक्रमाचा आढावा घेतला व सर्वांचे आभार मानले.

संध्याकाळी चहापानानंतर ४.३० वाजता पुन्हा पुढल्या वर्षी मोठ्या संख्येने जमावे असा निर्धार करून सर्वांना निरोप देण्यात आला.

शब्दांकन : श्री. प्रदीप अनंत मराठे,
कार्यवाह : गोमांतक मराठे परिवार समिती, गोवा. मोबाईल : ९४२०६८७२२०

**'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात**

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

**पाव पान रु. ६००/- * अर्धे पान रु. १,२००/- * पूर्ण पान रु. २,५००/-**

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.



Marathe Pratishthan

# RAMAKANT - PERSONAL LIFE SKETCH 5

- श्री. रमाकांत माधव विद्वांस (पृ.६२३)

## MY DAYS AT THE D. B. K. RAILWY PROJECT

After completion of tunnelling at Dongarwadi, in the year 1963, I joined The Hindustan Construction Co. Ltd. [HCC ] at Koyna Hydel Project near Chiplun. Our camp was in a jungle, about 20 kms. away from Chiplun, at the foot of SanhyadrI Mountains. The quarter allotted to me had been vacant for quite some time. The day we occupied it, we found a long yellow cobra skin lying on the floor. Locals who were moving in our baggage told us that it was a very good omen and we should not worry. Our stay at Koyna Project was very brief.

Thereafter, HCC transferred me to the Dandakaranya Bolangir Kiriburu - D. B. K. Railway Project. DBK Railway comprised of three lines – Dandakaranya Line from Koittavalsa to Kirandul passing through Andhra Pradesh, Tentacle of Orissa, and ending in Madhya Pradesh, Sambalpur to Titlaghar Line in Orissa passing via Bolangir and Bimlaghar to Kiriburu line located partly in Orissa and partly in Jharkhand. .

Dandakaranya stretched across the borders of Andhra Pradesh, Madhya Pradesh, Maharashtra and a tentacle of Orissa. All this area is now naxalite infested. The Kirundul- Kottavalasa (KKLine) is considered the engineering marvel of the Indian Railways. The 448-km KK line, connecting Kirundul and Vizag port, was commissioned in 1967. It was built to promote exports of the Iron Ore from Mines at Bailadila. It gradually rises at 1:60 gradient from the sea, at 1:60 with 8 degree curve passing through 59 tunnels (total tunnel length level gradually is 14km) along Anantagiri Mountains to reach Araku valley a distance of 105 km, Railway Station at Simliguda is situated at an elevation of about 1650 m. and is the world's highest broad gauge railway line station in the world. HCC's work involved construction of twentythree tunnels, many minor & major bridges and huge amount of earthwork in cuttings and embankments. etc which formed the most difficult part of the KK Line.

The terrain through which the railway line went up the mountains was along steep hill slopes. It was very difficult to construct approach roads leading to the tunnels and bridges. Many of the work spots were either 100 to 200 m. above or below the nearest approach roads. Materials had therefore to be carried by head load in about 25 kg. lots. Cement bags were divided in two parts to reduce the weight to around 25 kg. Construction equipment was carried to site in dismantled condition and reassembled.

On our work we engaged about a thousand local tribesmen. Tribesmen stayed in communes with a crude compound to keep animals away. Their huts had no locks. Within themselves, they were a permissive society but outsiders misbehaving with local women were killed by poisoned arrows. In those days, they were governed by their own tribal laws. Punishment for theft was beheading. Initially, when the survey for the railway line started there was lot of resistance from the tribesmen. They hated encroachment on their privacy. Overnight, they used to destroy the survey stations and pillars. Finally the Maharaja of Bastar made a proclamation and the resistance stopped.

The locals were very poor. Their needs were very few. They were happy with what they earned. Raghi – a kind of local millet was their staple diet. They cultivated raghi in their own fields. The forest was full of wild fruit. The locals used to collect fruit from forest and we could get 100 wild oranges or four big jackfruits for a rupee at our doorstep. They were good hunters and used bows and arrows or spears and javelins for hunting for meat. Their biggest enjoyment was drinking. The forest was full of Madhuca longifolia commonly known as Mahua trees. Flowers from these trees were a very good material for preparation of local alcoholic brew. Thus, for the tribesmen, the food and booze was almost free. Ladies used to be topless and the gents wore a small piece of cloth around their waist. They walked long distances to barter the wild fruit etc. for spices and condiments.

We tried to introduce many incentive schemes. But the tribesmen never got attracted. They completed the assigned task at the earliest and left for the day. This was a situation where new management theories did not work as the wages they earned were much more than what they needed.

With spare money in hand, they started visiting the local weekly market more often. Instead of walking to the market, they used local bus service. Spare money was spent on bangles and apparel and sometimes on movies. Slowly, their needs increased and they needed more money. They started responding to incentive schemes.

At the beginning of the project, we could get totally unadulterated pure milk but at the end of the project they learnt to add water to the milk to make easy money. Looking back I feel the developed society corrupted the innocent hardworking tribesmen and made them lazy.

Our contract involved a huge amount of earthwork in approach cuts to the tunnels and other deep cuts. Workmen from Palamoor District of Andhra Pradesh are known to be proficient in manual earthwork. We had over one thousand workmen from Palamoor. They seek work on contract basis and work only during dry months and go back to their fields for cultivation just before the rains. Before they mobilize, they are made an advance payment and at site they get their daily ration of food and a few 'chuttas' which are locally made cheroots. While working, they smoke the chuttas with its lighted end inside the mouth. It is said that the hot gases do not make them feel the hunger.

Our camp was at the foot of Anantagiri Ghat which leads to the picturesque Arku valley in Andhra Pradesh. It was in an Aranya in real sense. In our camps, we had fairly comfortable family accommodation. Our main camp had its own post and telegraph office and a small bazaar. Nearest village was 10 kms. away, nearest town was 20 kms. away and nearest city - Vishakhapattnam was 65 kms. away. We had diesel power and filtered water supply in our camp. Our camp had a bazaar man who would get us vegetables and provisions from Vishakhapattnam. We had a fully qualified resident doctor in our main camp and a trained medical attendant in every other camp. Our visits to Vishakhapattnam were once every month.

Supply of rice, wheat and sugar was controlled by the government and was available only through authorized shops. Logistically, it was impossible to arrange movement of such a large workforce to the nearest village. We therefore drew our supplies against bulk permits. We had a fortnightly rest day. With the help of a few of my colleagues, I ran a fair price shop on 'no profit – no loss' basis for distribution of rice, wheat and sugar to the workmen in the morning of our rest day. Our workmen were indeed grateful to me and my colleagues for this voluntary service.

Our workmen were best paid. However, some locally hired staff managed to form a union by promising our workers to get their wages substantially increased and an annual bonus equal to a few months' wages. On the advice of some small time local politicians the workmen went on a strike. As we were in the midst of a jungle, the District Collector moved in a contingent of special armed policemen. One afternoon, there was a fight between two groups of workmen in one of our distant camps up the mountains. We got a message that the injured were being transported in our ambulance van to our dispensary in the main camp. I was in charge of the dispensary. I reached the dispensary as the ambulance arrived. About six hundred strong mob of the workmen assembled near the dispensary. I stopped them in front of the dispensary and I tried to pacify them. When they saw their colleagues covered with blood, they got agitated. A police officer rushed with armed policemen. He told me that I was in danger but when I tried to explain that I was confident that they will not touch me, he whisked me away saying that it was his responsibility to protect me. The mob got violent and started shouting slogans against HCCs officers and demanding blood for blood. The policemen forced us and our families to the innermost residences and cordoned off our camp. The atmosphere became very tense. For our own protection, we collected two big heaps of stones and broke our beds to prepare sticks for fighting if necessary. Theladies were sitting with red chilly powder at hand. One officer calmed us down and assured us that they had over thousand bullets with them to control the mod and if necessary they would not hesitate to open fire even inside our residential camp. At one stage, a police officer went to pacify the mob but they encircled him and tried to grab his revolver. The police had no option but to fire a few rounds. A couple of agitators were injured and the others ran away. Work stopped for almost three weeks. Realizing their mistake, the workmen voluntarily withdrew the strike. For starting the work, I was one of the first one to reach the site. We completed the project with the same workmen

Our camp was in a saucer shaped valley with barren rocky hills all around.. Rains were associated with cyclonic winds. One afternoon, while we were resting, the roof of my residence was just lifted off by the winds. Since we were in our own camp, within a few minutes, all my things were shifted by our camp personnel. Carpenters soon moved in and my roof was fully restored before dark.

I travelled through the mountain road every day. Almost every evening, while returning home by a jeep, I came across a tiger, a leopard or at least a bear. Sitting in our camp, we have seen wild life moving around and through our camps.

We were constructing a masonry wall to divert a stream running across the railway alignment. It involved rock blasting along a steep crag for training the stream. One morning, the masons who went to start masonry found a leopard in the puddle of water below the masonry. It had probably slipped from top and one of its claws had got stuck in a crack in blasted rock. In those days, forest department was not equipped with tranquilizer bullets. We were forced to mercilessly kill the leopard as no one dared to set free an injured wild cat.

The Kirundul- Kottavalasa (KK Line) is considered the engineering marvel of Indian Railways. Construction of the railway line passing through very difficult terrain was possible only because the engineers from the railways and

contractors worked as a team in a very close co-operation.

All engineers who had worked on the project were invited to travel by the Inaugural Train. The train had eight saloons. We boarded the train at Srungavarapukota [S'kota] and detrained at Aarku. We traveled a distance of about 45 kms. crossing the whole of Anantagiri Mountains. The train stopped at the boundary of every village. The villagers garlanded the engine driver and offered flowers to engine. As the train started moving they escorted the train and handed it over to the next village. The journey of 45 kms. took us more than five hours. It was a real experience.

Today, the Kottavalasa - Kirandul line, that snakes its way through dense mountain region, is a major revenue earner for the Indian Railways. But operations on the line are an uphill task. With 58 tunnels (the total tunnel length is 10 km, the longest being 869 m), 84 major and 1,187 minor bridges (the longest bridge is 457 m, 584 curves and gradients touching 1 km in 60 km, special skills are needed to run the iron-ore laden trains. Because of the very steep gradient, loaded trains coming down the mountain needed enormous braking power resulting in heavy wear of the rails. Specially developed wear resistant rails are now being used for the line.

The line carries about 15 million tonnes of iron ore from Kirandul to Vizag annually, with a part of it being exported to Japan and the remaining consumed by the domestic steel industries, including the Essar and Vikram Ispat plants.

In 1966, I was posted at the Head Office of HCC in Mumbai to assist my boss in monitoring of existing underground works and tendering for new works and I left the D.B.K after gaining a great experience. I am proud that I had the opportunity to associate with construction of the Kirundul- Kottavalasa (KK Line) - the engineering marvel of Indian Railways.

**- रमाकांत विद्वांस, (पृ.६२३)**

३१,गुडविल ॲश्युरन्स सोसायटी, बीपीएल मोबाईल सेंटरच्यामागे, मनमाला टँक रोड, माटुंगा (प.), दूरध्वनी : ०२२-२४३०५२६०

## माझी शाळा

हा निबंधाचा ठरलेला विषय, प्रत्येक शाळेत प्रत्येक विद्यार्थ्याने दहा ओळींचा निबंध नक्कीच लिहिला असणार! हो ना?

प्रत्येकाला आपली शाळा आवडतेच हेही खरेच.

पण मी आज माझ्या शाळेबद्दल जे काही लिहिणार आहे, त्याबद्दल मला माझ्या शाळेचा खूप अभिमान आहे. कदाचित दुसऱ्या शब्दांमध्येदेखील तसे उपक्रम चालविले जात असतीलही, पण.... मी मात्र माझ्या शाळेबद्दल काही गोष्टी अभिमानाने सांगणार आहे.

सन १९६३ सालची गोष्ट. चेंबूर एक छोटंसं गाव, गाव म्हणजे "दूरदूर त्या तिथे, गाव एक इवलासा। अंगठीतला जणू पाचू खडा हिरवासा"

हे गाणे जणू माझ्या 'चेंबूर' गावाबद्दलच लिहिले आहे असे मला वाटते.

त्या गावात लालमातीची एक छोटी टेकडी, टेकडी चढण्यासाठी एक छोटी पाऊलवाट. पाऊलवाटेने वर गेल्यावर एक भले मोठे पटांगण व शाळेची एकमजली इमारत. शाळेचे नाव 'चेंबूर हायस्कूल' ह्या टेकडीवर फक्त माझ्या शाळेचे साम्राज्य. आसपास दुसरे काही नाही.

माझी शाळा तर विद्येचे 'ज्ञानमंदीर' होती. गोखले बाई, सांडूबाई, जोशी बाई, पंतसर, कान्हेरे सर, पंडित सर, कुलकर्णी बाई, करंदीकर बाई, फाटक सर, द्रवीड सर असे गुरू मला इथे लाभले.

ज्ञानसाधनेबरोबर माझ्या शाळेत इतर अनेक उपक्रम होत असत.

१. दरवर्षी जिथे पुष्पदीन साजरा होई - ती शाळा माझी!

२. दरवर्षी जिथे आंतरशालेय क्रीडा महोत्सव होई - ती शाळा माझी!

३. दरवर्षी प्रत्येक वर्गाचे हस्तलिखित मासिक निघे - ती शाळा माझी!

४. जिथे शिक्षकदिन साजरा होई - ती शाळा माझी!

५. जिथे चार दिवस शाळेचे स्नेहसंमेलन होई - ती शाळा माझी!

६. ज्या पटांगणावर मलखांब, जिमनॅस्टिक, बास्केटबॉल, कब्बडी, खो खो, या खेळांचे सामने रंगत - ती शाळा माझी!

७. जिथे आम्हा विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने 'स्टेडियम उभारले गेले - ती शाळा माझी!

८. आम्ही विद्यार्थ्यांनी निधी गोळा करून बीएड कॉलेजच्या स्थापनेला हातभार लावला - ती शाळा माझी!

९. एक पेढा, ८० विद्यार्थ्यांना वाटणारे पाटील सर ज्या शाळेत होते - ती माझी शाळा!

काय काय सांगू? किती सांगू? अनेक हृद्य आठवणीने मन भरून आले आहे.

शेवटी इतकेच म्हणजे 'माझी शाळा, ती माझीच शाळा!'

**- सौ. मीना सदानंद मराठे, (पृ.४१७),**

फ्लॅट नं.४८६, बत्तीसावा रस्ता, बी राधानारायण, बांद्रा (प.), मुंबई- ४०००५०

फोन - ०२२-२६४५९५६०/६५७२३०४४, मोबाईल : ९८२१५८९२०५

# सौभाग्य अलंकार

श्री. अ. द. मराठे (पृ.२७०)

मराठीमध्ये सौभाग्य हा शब्द विवाहित स्त्रीशी संबद्ध बनला आहे. त्याचा मूळ अर्थ चांगले भाग्य असा आहे. मात्र पती जिवंत असलेली स्त्री या अर्थाने तो मराठीत वापरला जातो. एवढेच नव्हे तर पत्नी या अर्थानेही तो वापरला जातो. जुन्या काळच्या लग्नपत्रिकेत जिचे लग्न होणार असेल तिचा उल्लेख 'सौभाग्यकांक्षिणी' म्हणजेच सौभाग्याची इच्छा करणारी असा होता आणि विवाहोत्तर ती 'सौभाग्यवती' म्हणजेच सौभाग्यानेयुक्त अशी होते. या सौभाग्यवतीचे खास अलंकार मानले आहेत. त्यातील मंगळसूत्र, बांगड्या, नाकांतील नथ आणि वेढणी किंवा जोडवी हे चार अलंकार केवळ विवाहित स्त्रीचेच मानले आहेत. वैधव्य आलेल्या (धव - पती - मराठी 'घोव) ते निषिद्ध आहेत. या चार अलंकारांपैकी नथ हा अलंकार या ना त्या रूपात अखिल भारतीय आहे. बंगाल, राजस्थान, गुजराथ या प्रदेशात बांगड्यांना सौभाग्य अलंकार म्हणून आपल्याकडील मंगळसूत्राचे महत्त्व आहे. आणि काळ्या मण्यांची माळ व नथ हे दुय्यम दर्जाचे पण सौभाग्य अलंकार मानले आहेत. साधारणत: दुय्यम दर्जाचे सौभाग्य अलंकार कुमारिकांनी वापरलेले चालतात. मात्र विधवांना ते पूर्णपणे निषिद्ध आहेत. पायाच्या बोटातील वेढणे हा सुद्धा सर्वत्र दुय्यम सौभाग्यअलंकार आहे. सौभाग्य अलंकारांचा उपयोग दुहेरी आहे. बांगड्या आणि काळे मणी हे पतीचे दुष्ट शक्तींपासून संरक्षण आणि अकालमरण दूर ठेवणारे असे आहेत. साहजिकच ते तुटणे, फुटणे हे मृत्यूचे प्रतीक आहे. मराठ्यांचा पानिपतवर जो प्रचंड पराभव झाला त्याचे वर्णन करताना 'एक लाख बांगडी फुटली' असे केले आहे.

सौभाग्यअलंकार हे जरी लोक प्रचारात महत्त्वाचे मानलेले असले तरी आश्चर्याची गोष्ट अशी की विवाहविधीमध्ये हा वैदिक विधी मानला जात नाही. हे अलंकार धारण करताना कोणते वैदिक मंत्र म्हणावे याचाही कुठे ठाम उल्लेख नाही. सौभाग्यलंकार हे पुरोहित विशिष्ट मंत्र म्हणून वराच्या हस्ते वधूला घालत नाहीत. अनेक ठिकाणी बहीण ते आपल्या भावजयीच्या गळ्यात घालते. काही ठिकाणी वर ते स्वहस्ते घालतो; तर काही जातींमध्ये ते वेश्याच्या हस्ते घातले जातात. त्यामुळे त्या अलंकारात वेश्येच्या 'अखंड सौभाग्यवती' हा गुण उतरतो.

सौभाग्य अलंकाराच्या मण्यांचे रंगसुद्धा ठिकठिकाणी वेगळे आहेत. राजस्थानमध्ये लाल बांगड्या, महाराष्ट्रात हिरव्या बांगड्या धारण केल्या जातात. बंगाली स्त्रिया 'शोंको' आणि 'लोहा' म्हणजे शंखाच्या आणि लोखंडांच्या बांगड्या धारण करतात. मात्र या लोखंडी बांगडीवर सोन्याची तार लावल्याशिवाय कोणी वापरत नाहीत. कारण स्त्रियांचा सुवर्णलोभ! त्या सोन्याच्या आवरणांतून मधून मधून लोखंड दिसले की झाले. आमच्या राजापूर (जि. रत्नागिरी) येथे लाकडाचे भारे, गवताचे भारे विकायला येणाऱ्या बायका कथिलाच्या बांगड्या, वेढणे घालील. मात्र या बांगड्या खांदा ते दंड अशा असत. शंखाच्या बांगड्यांचे मूळ मात्र सिंधुसंस्कृतीइतके जुने आहे. सिंधुसंस्कृतीच्या उत्खननांत शंखाच्या बांगड्या मिळाल्या आहेत. एका मुद्रेत तर मनगटापासून खांद्यापर्यंत शंखवलये धारण केली आहेत. बाणाच्या 'कादंबरीत' शंकराने मदनाला भस्मसात केल्यानंतर रती शोक करीत आली, तेव्हा तिच्या दोन्ही हातांमधून वलयांचा वर्षाव झाला असे वर्णन आहे. यातील अत्युक्ति जरी सोडली तरी वैधव्य आणि बांगडी यांच्यातील भंगाचे नाते दिसून येते. पतीच्या दीर्घायुष्याची इच्छा व्यक्त करताना 'मला चुडेदान दे' अशी विनवणी करतात. 'सावित्रीचा चुडा' हा तर मराठीतील प्रसिद्ध वाक्प्रचार आहे. मात्र गंमत अशी की सावित्रीच्या कथेत तिच्या चुड्यांचा कुठेही उल्लेख नाही. स्थळकाळानुसार रिती, परंपरा बदलतात त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. सावित्री-बांगड्या- पतीचे दीर्घायुष्य ही मालिका लोकसंस्कृतीने निर्माण केली आहे. वैदिक साहित्यांत परि + भू (परिभवती) या धातूचा अर्थ 'सर्व बाजूंनी संरक्षण करणे' असा होतो. बांगडी हा अलंकार त्या अर्थाचे प्रतीक आहे.

कौशितकी गृह्यसूत्र आणि शांखायन गृह्यसूत्र यांच्यामध्ये तीन लाल किंवा काळे मणी वधूच्या गळ्यात बांधावेत असे सांगितले आहे. या विधानामागे सौभाग्य आणि पतीचे दुष्ट शक्तींपासून संरक्षण आणि अकाल मृत्यू टाळणे हे स्पष्टपणे दिसून येते. या प्रसंगी म्हणण्याच्या वैदिक मंत्रांचा उल्लेखही दिला आहे. मात्र यातील तीन धाग्यांचा उल्लेख हा काही सौभाग्य अलंकाराचे आवश्यक अंग वाटत नाही. या मागे लोकसांस्कृतिक धारणा आहे. आणि तिचा उल्लेख हर्षचरितांत बाणभट्टाने केला आहे. तिथे कापसाच्या न फुटलेल्या बोडांतून कापूस काढून उच्चकुलीन विवाहित स्त्रिया धागे काढीत होत्या. नंतर त्या दोऱ्यावर केशर आणि कुंकुम लावत होत्या. भासाच्या स्वप्नवासवदत्तम नाटकात वरमालेत सपत्नीमर्दन (सवतीा नाश) आणि अविधवाकरण या नावाच्या वनस्पती गुंफल्या गेल्याचा उल्लेख आहे. कौषितकगृह्यसूत्राचा एक टीकाकार वरमालेत मोहाची फुले गुंफावीत असे सांगतो. सौभाग्यलंकार धारण करण्यापूर्वी मधुमतीरोषधी:.... या मंत्राचा उपदेश केला जातो असे एका गुरुजींनी सांगितले.

वैदिक मंत्रांमध्ये वधूवरांना दीर्घायुष्य आणि अन्य संपत्ती मिळावी असे म्हटलेले असते. मात्र या सर्व वैदिक मंत्रांचे अर्थ सर्वसामान्य माणसांना तर सोडाच पण खुद्द पुरोहितांनाही कळत नसतात मग अशावेळी 'स्थितस्य गतिश्चिन्तनीया' (बसलेला माणूस कुठच्या दिशेने जाणारे हे काहीतरी गृहीत धरून अंदाज करावा लागतो.) या उक्तीनुसार काही लोकप्रचलित धारणांचा त्यात समावेश करावा लागतो. अशा सोयी आणि प्रथांची विविधता हिंदू धर्मातच दिसते;

मराठी मंगळसूत्रांत सोन्याचा वाट्या आवश्यक असतात. त्या नंदीपदाचे (गोपद्माचे) प्रतीक आहेत.

सौभाग्य अलंकारांसाठी सोने, लोखंड, जस्त, चांदी, शंख, हस्तिदंत, काचेचे लाल किंवा काळे मण वापरण्याची परंपरा आहे. यात नवरत्न आणि विविध खडे वापरले जात नाहीत. मंगळसूत्र हा महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश यांचा सौभाग्य अलंकार आहे. तेथे काळे मणी आणि सोन्याच्या वाट्या सौभाग्य अलंकारात वापरल्या जातात. त्या नंदिपदाचे/गोपद्मांचे प्रतीक आहेत. जेव्हा विधुर पुरुष दुसरा विवाह करतो त्यावेळी त्या पत्नीच्या मंगळसूत्रात 'सवत' या नावाने प्रसिद्ध असलेली सोन्याची एक चकती त्या मण्यांच्यामध्ये समाविष्ट केली जाते. पूर्वोक्त सपत्नी मर्दनाच्या आविष्कार आहे. तामिळनाडूत मंगळसूत्राला 'थली' म्हणतात. थली हे मंगळसूत्रांत वाट्यांच्या ऐवजी पदक असते आणि त्यावर ॐकार, तुलसीपत्र, क्रॉस (केरळी ख्रिश्चनांमध्ये) किंवा वधुवरांच्या पंथांचे चिन्ह समाविष्ट केलेले असते. मध्यप्रदेशात 'पगलिया' नावाचा सौभाग्य अलंकार आहे. तो अलंकार पुनर्विवाहित विधवेनेच घालायचा असतो. समजा तिला पुन्हा वैधव्य आले, तर ती पुनर्विवाह करते आणि दुसरा पगलीया धारण करते. तिचे जितके विवाह होतील तितके तिने पगलिया धारण करायचे असतात!

विवाहित असूनही मंगळसूत्र न वापरणाऱ्या स्त्रिया आहेत. तशाच मंगळसूत्र वापरणाऱ्या विधवा स्त्रिया आहेत. त्याविषयी बोलताना एक बाईंनी सांगितले, ''स्त्री विधवा आहे असे कळले/ दिसले की तिच्याकडे बघणाऱ्या पुरुषांचा दृष्टीकोन एकदम बदलतो. ते तिच्याकडे 'प्रॉस्पेक्टिव्ह वूमन' म्हणून बघतात. उलट गळ्यात मंगळसूत्र दिसले की तिच्यामागे कोणी समर्थ पुरुष आहे; तेव्हा इथे जपूनच वागले पाहिजे हे त्यांच्या मनात येते. (म्हणजे आधुनिक काळात मंगळसूत्र खऱ्या अर्थाने संरक्षण देते)

खूप वर्षांपूर्वी मी शृंगेरी (तुंगा) इथे संस्कृत संभाषण वर्ग या उपक्रमासाठी शाळेकडून डेप्युटेशनवर गेलो होतो. तिथे आम्हाला मार्गदर्शन करायला एक बाई आल्या होत्या. त्यांचा परिचय कुमारी दीपप्रभा असा करून दिला होता. त्यांच्या गळ्यात मंगळसूत्र होते. मी त्यांना विचारले, ''इकडे कुमारिकासुद्धा मंगळसूत्र वापरतात का?'' त्यावर त्यांनी उत्तर दिले, ''ते मंगळसूत्र आहे ना? मग ते मांगल्याचे प्रतीक म्हणून कुमारिकाच का पुरुषांनी वापरायला सुद्धा काय हरकत आहे?'' मी त्यांना म्हणालो, ''तुमचा परिचय विदुषी जाणकार असा करून दिला गेला तो अत्यंत सार्थ आहे.''

- श्री. अ. दा. मराठे, (पृ.२७०)
१० शांतिनाथ अपार्टमेंट, १६८
यशवंत नगर, तळेगाव दाभाडे (पुणे) फोन : ९८५०२४१९१४

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक १५ मार्च, २०१३ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक मराठे उद्योगभवन, प्रभादेवी येथे झाली. बैठकीला श्री. आनंदराव मराठे, श्री. रमाकांत विद्वांस, श्री. हेमंत मराठे, सी. गो. खांबेटे, श्री. वा. ग. मराठे, श्री. सुरेश मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे, श्री. प्रभाकर मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे इ. कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी मागील इतिवृत्त वाचून दाखविले. प्रतिष्ठानचे आलेल्या पत्रव्यवहाराचे वाचन झाले. हितगुजला २०००रु. वर्गणी पाठवून कुलबांधव चांगला प्रतिसाद देत आहेत म्हणून सर्वांनी समाधान व्यक्त केले.

(सुलभाताईंनी घरून आणलेल्या स्वादिष्ट फराळाने, चहापानाने सभेची सांगता झाली.)

शुक्रवार दिनांक १२ एप्रिल, २०१३ ला मराठे प्रतिष्ठानची बैठक श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या निवासस्थानी माहीम येथे भरली. सभेला श्री. आनंदराव मराठे, श्री. रमाकांत विद्वांस, श्री. व्ही. के. मराठे, सी. गो. खांबेटे, हेमंत मराठे, सुरेश मराठे, प्रभाकर मराठे, डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, श्रीमती सुलभाताई मराठे, श्रीनिवास मराठे, भाऊ मराठे इ. उपस्थित होते. कार्यवाह हेमंत मराठे यांनी मागील इतिवृत्त वाचले. 'हितगुज' विषयी चर्चा झाली. अनेक सूचना केल्या गेल्या. पत्रव्यवहाराचे वाचन झाले. 'हितगुज'चा छपाईखर्च, मुद्रणखर्च व टपाल-कुरिअरचा खर्च मंजूर करून घेतला. आपले कुलबांधव चार्टर्ड अकाऊटंट श्री. श्रीकांत मराठे, बोरीवली यांनी सर्वांना गुढीपाडव्याच्या शुभेच्छा पत्राद्वारे दिल्या आहेत. तसेच त्यांनी स्वत: रचलेली 'आकांक्षा' नावाची शुभेच्छात्मक कविता श्री. भाऊ मराठे यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत वाचून दाखविली. सर्वांनी कवितेची प्रशंसा केली. 'हितगुज' मध्ये ती प्रकाशित होईलच.

विशेष म्हणजे श्री. आनंदराव मराठे यांनी श्रीमती सुलभाताई मराठे नेहमी बैठकीसाठी सहकार्य करतात, मराठे उद्योगभवनात बैठक भरली तरी घरून फराळाचे आणून उत्तम सरबराई करतात, घरी बैठक होते, तेव्हाही स्वागत करून कार्यकारिणीला सतत प्रोत्साहन देतात याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कृतज्ञता म्हणजे आपल्याला जे काही मिळालं त्याची जाणीव असणं. आभार मानणे सुलभाताईंना रूचले नसते हे ओळखून कृतज्ञता व्यक्त केली. सर्वांनी त्यांना अनुमोदन दिले. लाल भोपळ्याचे गोड घारगे आणि भेळ, चहापानाने सभा संपली.

**सगळ्या आठवणी जपून ठेवा, त्या पुन्हा जगता येत नाहीत**

- बॉब डीलन

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दिनांक १२-१-८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५
दूरध्वनी : २४३०२४५३ * फॅक्स : ९१-०२२-२४३७९८६३ * e-mail : maratheparivar@yahoo.com

**३१ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके :** १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३

**वार्षिक सर्वसाधारण सभा :** रविवार ११ ऑगस्ट, सकाळी १० वाजता

**सभास्थान :** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, दादर

## विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी/ भ्रमणध्वनी | वास्तव्य | कुवृपृ |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त | ९८६९००५७६६ | ठाणे, प. | २७७ |
| २. श्री. रमाकांत माधव विद्वांस | विश्वस्त-कार्याध्यक्ष | ९८२०२२४०१४ | माहिम, मुंबई | ६२३ |
| ३. श्री. विनायक केशव मराठे | विश्वस्त | २४३०३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ४. श्री. वामन गणेश मराठे | विश्वस्त | २५८६१७०० | पुणे | ५०३ |
| ५. श्रीमती सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४६३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

## कार्यकारी मंडळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री. रमाकांत माधव विद्वांस | विश्वस्त- कार्याध्यक्ष | ९८२०२२४०१४ | माहिम, मुंबई | ६२३ |
| २. श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | कार्योपाध्यक्ष | ९७५७४२९३३९ | अंधेरी, पू. मुंबई | ६७६ |
| ३. श्री. मोहन सदाशिव मराठे | कार्यवाह | ९८१९९६४७६५ | खार,प. मुंबई | ३६५ |
| ४. श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९२२०६९९९५७ | नालासोपारा | ०२१ |
| ५. श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ६. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद (संपादक हितगुज) | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ७. श्री. प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २५४७७५११ | ठाणे, मुंबई | ७६७ |
| ८. श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ९. श्री. सुरेश वामन मराठे | सभासद | ९८७००१७१५० | डोंबिवली, मुंबई | ५०३ |
| १०. श्री. उदय दत्तात्रय मराठे | सभासद | | मुलुंड, मुंबई | |
| ११. श्री. अरुण दत्तात्रय मराठे | सभासद | ०२०-२४४७३२८९ | पुणे | ०६१ |
| १२. सौ. अदिती यशवंत मराठे | सभासद | २४४७३२८९ | माहिम, मुंबई | ३९९ |

**बँकर्स : १. सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई * २. युको बँक, टिळक रोड, पुणे**

---

मराठे प्रतिष्ठान,

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना : मराठे प्रतिष्ठानची ३१वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार ११ ऑगस्ट, २०१३ रोजी सकाळी १० वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक सभागृह, दादर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सभेपुढील विषय :

१. दिनांक १५ सप्टेंबर रोजी झालेल्या ३०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा मराठे प्रतिष्ठानचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व जमाखर्च मंजूर करणे.

३. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणी सदस्यांची मुदत संपत असल्याने पुढील तीन वर्षांकरिता कार्यकारिणीची निवड करणे. इच्छुकांनी आपली नावे आगाऊ कळवावी.

४. सन २०१३-२०१४ साठी हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.

५. सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर, तसेच मराठे प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचारविनिमय करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून
श्री. मोहन सदाशिव मराठे, कार्यवाह

**टीप :**

१. गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल. त्याला गणसंख्येची पूर्ती आवश्यक नाही.

२. वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत. काही खुलासा हवा असल्यास सभेच्या ७ दिवस अगोदर समक्ष, पत्राने, ई-मेलने विचारावा.

३. मराठे प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल प्रस्ताव, ठराव किंवा सूचना करावयाच्या असतील तर सभासदांनी त्या सभेच्या ७ दिवस अगोदर कार्यालयात किंवा ई-मेलने पाठवाव्यात.

४. कार्यकारिणीमध्ये काम करण्यासाठी इच्छुक सभासदांचे स्वागत आहे. त्यांनी त्वरित संपर्क साधून आपले नाव कळवावे.

५. सभेला येताना या अहवालाची प्रत सोबत आणावी.

## ३१वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके (१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३)

सभासद बंधू भगिनींनो,

मराठे प्रतिष्ठानचा दिनांक ३१ मार्च २०१३ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजे ३१ वा वार्षिक अहवाल सादर करण्यास कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

**सभासद :** वृत्तांत साली आजीव सदस्य संख्या १४४५ झाली. हितचिंतक १०. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे मराठे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे

हितगुजची नवीन वर्गणी रु.२०००/- झाली. जून २०१३ च्या अंकानंतर, जुने वर्गणीदार रद्द ठरविले जातील. ज्यांनी रु. २०००/- प्रमाणे वर्गणी दिली असेल त्यांनाच अंक पाठविला जाईल. तरी यापुढे प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुष व्यक्तीने मराठे प्रतिष्ठानच्या सदस्यत्वासाठी रु. ५००/- व हितगुज शुल्क रु. २०००/- पाठवावेत.

मराठे प्रतिष्ठानची ३०वी वार्षिक सर्वसाधारण सभा १५ सप्टेंबर, २०१२ रोजी सकाळी १० वाजता लक्ष्मीकेशव हॉल, ठाणे येथे आयोजित करण्यात आली होती. गणपूर्तीअभावी सदर सभा त्याच ठिकाणी ठीक १०.३० मिनिटांनी संपन्न झाली. सभेचे अध्यक्षस्थान मराठे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. आनंद मराठे यांनी भूषविले. सभासदांची उपस्थिती लक्षणीय होती. सभेमध्ये अतिशय चांगल्या प्रकारे विविध विषयांवर चर्चा झाल्या.

**महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे :**

१. वार्षिक सर्वसाधारण सभेचे आमंत्रण देताना गेले दोन वर्षे सभेची नोटीस छापली जात नाही, तसेच कार्यकारिणी सदस्यांची नावे चुकत आहेत. व अहवाल त्रोटक असतो यामध्ये सुधारणा व्हावी असे सर्व उपस्थितांनी सुचविले. सहकार्यवाह श्री. हेमंत अरुण यांनी याबद्दल दिलगिरी व्यक्त करून मराठे प्रतिष्ठानतर्फे माफी मागितली.

२. श्री. लक्ष्मण शंकर मराठे यांच्या नातीने शिक्षणासाठी घेतलेल्या कर्जाऊ रक्कमेमध्ये ५००० रु. ची भर घालून रु. १५०००/- चा धनादेश देऊन इतरांपुढे आदर्श निर्माण केला.

३. श्री. ह. मो. मराठे यांना साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा दिल्या.

४. सभेसाठी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्या आला. सर्वश्री श्री. वसंतराव मराठे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. श्री. मधुसूदन खांबेटे व श्री. अभिजित फडणीस यांचाही सत्कार करण्यात आला. श्री. विनय मराठे, सौ. अनघा मराठे, श्री. संतोष जोशी यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला.

**: सन २०१२-२०१३ सालातील विशेष उल्लेखनीय घटना :**

१. गांधर्व महाविद्यालय, पुणे याला ८० वर्षे पूर्ण झाली त्याप्रीत्यर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य पं. प्रमोद मराठे यांनी आद्यगुरू पं. विष्णू दिगंबर पलुस्कर आणि त्यांचे पट्टशिष्य पं. विनायकबुवा पटवर्धन यांचे प्रती कृतज्ञता समारोह आयोजित केला. (हितगुज जून २०१२ पान २)

२. बडोदा राज्याचे श्रीमंत श्री सयाजीराव गायकवाड यांची १५०वी जयंती या वर्षी असल्याने त्यांच्या अनेकविध पैलूंपैकी एका पैलूवर, सौ.

अंजली आशुतोष मराठे, बडोदे (पृ. ३८०) यांनी प्रकाशझोत टाकला (हितगुज जून २०१२पान ५ आणि ६) श्रीमंत श्री सयाजीरावांबद्दल संपूर्ण माहितीसाठी याच सालात प्रकाशित झालेले श्री. बाबा भांड यांचे पुस्तक अवश्य वाचावे.

३. श्री. प्र. सी. मराठे यांनी 'सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी' हा बहुमोल ग्रंथ लिहिला. तसेच हा ग्रंथ मराठे प्रतिष्ठानला दिला. त्यांचे हार्दिक अभिनंदन. (हितगुज जून २०१२, पान ६ आणि ७)

४. श्री. मुकुंद मराठे (पृ. ३६९) यांनी संगीत, सायन्स, खगोलशास्त्र, अवकाश अशा वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. त्यांचेवर 'प्रकाशझोत' टाकला आहे. (हितगुज जून २०१२ पान १२)

५. श्री. विलास भिकाजी मराठे (पृ. ३६५) यांना राष्ट्रपती सुवर्णपदक शौर्य पुरस्कार मिळाला. माननीय राज्यपालांचेहस्ते त्यांना प्रशस्तीपत्रक व पदक देऊन गौरवण्यात आले.

६. सध्याच्या तरुणाईने अवश्य वाचावे असे 'रमाकांत पर्सनल लाईफ स्केच' आपण यावर्षी हितगुजमध्ये प्रकाशित केले. अतिशय सुंदर आणि सोप्या भाषेत श्री. रमाकांत विद्वांस यांनी आपले लाईफ स्केच सादर केले आहे. सर्वांनी या वर्षीचे सर्व अंक जरूर वाचावे. हितगुज जून २०१२च्या अंकापासून क्रमश:

७. सौ. सुजाता व श्री. चंद्रकांत वामन मराठे, ठाणे यांची कनिष्ठ कन्या चि.सौ.कां. केतकी हिचा विवाह चि. जयेश माधव जोशी यांजबरोबर २८.४.२०१२ रोजी ठाणे येथे संपन्न झाला.

८. 'चला बदल घडवू या' या गिरीश जाखोटिया लिखित पुस्तकाला 'पद्मगंध प्रतिष्ठान पुरस्कार' नागपूर मिळाला. (हितगुज जून २०१२, पान २२)

९. व्रतबंध : श्री. सदाशिव गोपाळ जोशी यांचा नातू चि. स्वानंद जितेंद्र जोशी याचा व्रतबंध, २६.२.१२ रोजी पुणे येथे संपन्न झाला.

१०. सौ. मीना महेश मराठे यांनी संकलित केलेले 'शब्दविभोर' हे पुस्तक शुभ क्रिएशन, पुणे यांनी प्रकाशित केले.

११. उज्जव गिरीश जाखोटिया (पृ. १२८) शालांत परीक्षेत ९१% गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

१२. वरदा अभिजित काणे (पृ.६७६) हिला पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती (४थी) परीक्षेत ३०० पैकी २७८ गुण मिळाले व मुंबईत नववा आला.

१४. विंग कमांडर (नि.) यशवंत मराठे यांचा या सालामध्ये संपूर्ण भारत : सायकलप्रवास पूर्ण झाला. सदर माहिती हितगुज सप्टेंबर २०१२ (पान १४-१५)

१५. पोहणारे वीर : श्री. दत्तात्रय आत्माराम मराठे, मुलुंड (पू.) यांच्या कामगिरीचा गौरव मुंबईचे महापौर श्री. सुनील प्रभू यांनी केला. आणि मढमुंबई क्रीडा व ललि कला प्रतिष्ठानचे सन्माननीय वार्षिक सभासदत्व विनामूल्य बहाल केले. (Taking the Plunge वाचा हितगुज सप्टेंबर २०१२, पान नं.१६)

१६. कु. सायली जयंत मराठे दहावीध्ये ७५.४५% गुण मिळाले. कु. मृणाल आनंद मराठे दहावीमध्ये ९०.१७% गुण मिळाले.

१७. श्रीमती रमाबाई रानडे यांनी स्थापन केलेल्या पुणे सेवासदन सोसायटीला, त्यांचे पणतू श्री. रमाकांत विद्वांस यांनी त्यांच्या विवाहास पन्नास वर्षे झाल्यानिमित्ताने रु.२,५०,०००/- ची देणगी दिली. त्याबद्दल उपकृत होऊन पुणे सेवासदन सोसायटीने मंगळवार दिनांक २.१०.२०१२ रोजी संपन्न झालेल्या राठी प्रशालेच्या वर्धापनदिनी श्री. रमाकांत यांचे वडील प्रा. कै. माधवराव ऊर्फ देवदत्त विद्वांस यांचे नाव शाळेच्या ग्रंथालयास दिले.

१८. मृण्मयी सचिन मराठे हिला माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत रत्नागिरी शहर विभागाकडून ३०० पैकी २१६ गुण मिळाले व गुणवत्तायादीत २४वी आली.

१९. चि. सिद्धार्थ अभय जाईल (पृ. ७५३) दहावीमध्ये ८८% गुण मिळाले.

२०. चि. अथर्व विजय मराठे दहावीमध्ये ८२.१८% गुण मिळाले.

२१. नीरज हेमंत मराठे (पृ.३८०) यास सीमेन्स कंपनीकडून, सीमेन्स स्टुडंट ॲवॉर्ड २०१२ ट्रॉफी, सर्टिफिकेट आणि पाच हजार युरोचा चेक अर्पण करण्यात आला. (हितगुज डिसेंबर १२, पान २०)

२२. मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. मोहन सदाशिव मराठे यांनी त्यांच्या आयुष्यातील वेगवेगळ्या प्रवासांवर आधारित 'माझा जगप्रवास' हे पुस्तक प्रकाशित झाले.

२३. मराठे प्रतिष्ठानचा ३४ वा वर्धापनदिन,पुणे शाखेतर्फे सालाबादप्रमाणे २६ जानेवारी, २०१३ रोजी वेदशास्त्रोत्तक सभागृहात पार पडला.

२४. मराठे प्रतिष्ठानच्या सदस्या (माहेरवाशीण) श्रीमती कुमुद डोके, ठाणे यांनी आपले वडील कै. वामन आत्माराम मराठे यांचेवर अतिशय भावूक शब्दामध्ये लिखाण केले आहे. (हितगुज मार्च २०१३, पान १४)

२५. डॉ. गिरीश जाखोटिया यांनी 'छत्रपती शिवाजी व २१वे शतक' हे अतिशय सुंदर असे पुस्तक लिहिले आहे. (त्याचे परीक्षण हितगुज मार्च,२०१३, पान ६)

२६. चि. शरयू गिरीश जाखोटिया हिला 'ऑर्गनायझेशन ऑफ वुमेन इन इंटर्नॅशनल ट्रेड' या नामांकित संस्थेचा २०१२ सालचा पुरस्कार जाहीर

झाला. सदर पुरस्कार१५.११.२०१२ रोजी फ्लोरिडा येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत दिला गेला. (हितगुज मार्च २०१३, पान ६)

२७. कु. आभा अभिजित मराठे हिचा पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यातून ४था नंबर आला. गुण ३०० पैकी २७४.

२८. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींवर मात करण्यासाठी अध्यात्मिक कल 'विघ्नोंपर विजय' या पुस्तकाचे प्रकाशन २६ जानेवारी २०१३ च्या पुणे येथील वर्धापनदिनाच्या कार्यक्रमामध्ये झाले. लेखिका सौ. सरोजिनी मराठे व श्री. अनुरूप मराठे.

**: सहवेदना :**

१. श्रीमती लीलाताई अनंत मराठे (पृ. ३९२) यांची २९.५.२०१२ रोजी प्राणज्योत मालवली.

२. श्री. गणेश परशुराम मराठे (पृ. १८) कल्याण, यांचे १४ जून, २०१२ रोजी वार्धक्याने निधन झाले. कै. नारायणराव मराठे यांचे ते भाऊ होते.

३. साप्ताहिक किरातचे संपादक श्रीधर मराठे यांचे दु:खद निधन झाले. तारीख ७.६.२०१२. श्रीधर मराठे यांची पूर्ण माहिती हितगुज सप्टेंबर २०१२, पान १५.

४. श्री. मधुकर रामचंद्र मराठे, पाली, सुधागड, यांचे २९.४.२०१२ रोजी वयाच्या ७८व्या वर्षी निधन झाले.

५. श्री. मोहन दिनकर मराठे, कोल्हापूर यांचे २.५.२०१२ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. वय ६३ वर्षे

६. श्री. प्रभाकर काशिनाथ मराठे, गोरेगाव (जि. रायगड) यांचे ६.६.२०१२ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले.

७. विरार, आगाशी येथील ॲड. दिवाकर गोविंद विद्वांस यांचे १६.६.२०१२ रोजी देहावसान झाले. आणि समाजवादी चळवळीच्या कार्यातील वसई तालुक्यातील एक दुवा निखळला. आपल्या पित्याच्या कार्याचा आढावा त्यांची कन्या सौ. केतकी किशोर पेंडसे यांनी घेतला. हितगुज सप्टेंबर, २०१२, पान २०-२१

८. प्रसिद्ध लेखक, आपले कुलबांधव श्री. प्रभाकर सी. मराठे यांच्या धर्मपत्नी कै. सौ. सुनीता यांचे २३.८.२०१२ रोजी दु:खद निधन झाले.

९. सौ. सुधा श्रीपाद मराठे मूळ पाळी, ता. डिचोली, गोवा यांचे ७.९.२०१२ रोजी दु:खद निधन झाले. (हितगुज डिसेंबर २०१२, पान १७)

१०. ८.११.२०१२ रोजी ज्येष्ठ विद्युत परीक्षक विष्णू तथा अरविंद रामचंद्र मराठे, (वय ८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.

११. १.११.२०१२ रोजी ज्येष्ठ पशुवैद्य डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे (वय७२) यांचे आकस्मिक निधन झाले.

१२. श्री. प्रभाकर जनार्दन जाईल, पुणे यांचे ३ ऑगस्ट २०१२ ला दु:खद निधन झाले.

१३. श्रीमती गिरिजाबाई महादेव चक्रदेव (श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांच्या मातोश्री) यांचे १९.९.२०१२ या दिवशी वयाच्या १००व्या वर्षी देहावसान झाले.

१४. हितगुजमधील 'दिवाळी फराळ'चे लेखक श्री. ग. भा. मराठे, घाटकोपर यांचे २२.१२.२०१२ रोजी दु:खद निधन झाले. (हितगुज मार्च २०१३, पान८)

१५. सौ. सुधा श्रीपाद मराठे यांचे ७.९.२०१२ रोजी दु:खद निधन झाले. (हितगुज मार्च २०१३, पान १५)

**- मोहन मराठे, कार्यवाह, खार (पृ.३६५)**

---

# आकांक्षा

*कळीचे फूल व्हावे, फुलाचे अत्तर व्हावे*
*आकांक्षांचे स्वप्न व्हावे, स्वप्नाचे सत्य व्हावे ॥१॥*

*अनिष्ट जावे, इष्ट यावे*
*सोसलेल्या पराभवातून उद्याचे विजय यावे ॥२॥*

*उण्याचे अधिक व्हावे, नव्हत्याचे होते व्हावे*
*सरलेल्या शिशिरातून वसंताने वर्धिष्णु व्हावे ॥३॥*

*तमातून किरण यावे, किरणांचे आभाळ व्हावे*
*उजळलेल्या आभाळात आयुष्याचे सोने व्हावे ॥४॥*

*उमेदीच्या प्रयत्नांना यशाचे तुरे यावे*
*प्रार्थनेच्या शुभकाराला 'तथास्तु' दैवी असावे ॥५॥*

**- श्रीकांत वसंत मराठे**
वनश्री, प्लॉट नं. १३८, अभिनव नगर, रोड नं. ६ बोरिवली (पू.), मुंबई ४०००६६ फोन :

THE BOMBAY PUBLIC TRUST ACT,1950
SCHEDULE VIII
[VIDE RULE 17 (1)]

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** REG. NO. E-7918 (BOM)

INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED : **31ST MARCH, 2013**

| **EXPENDITURE** | **RS.** | **RS.** | **INCOME** | **RS.** | **RS.** |
|---|---|---|---|---|---|
| **To Audit Fees** | | 5,000.00 | By Intersest on Fixed Deposits | | 29,143.75 |
| **To Expenditure on the objects of Trust** | | | **By Interest on Saving Bank Account** | | |
| **Mumbai Mukya Karyalaya Expeneses** | | | With Saraswat Co-op Bank, Worli | 2,889.00 | |
| Annual Meeting Expenses | 13,200.00 | | With UCO Bank, Pune | 1,779.00 | 4,668.00 |
| Postage Expenses (MU) | 330.00 | | | | |
| Printing & Stationery | 172.00 | | | | |
| Anita Khambete Smruti Yojana ® | 1600.00 | | | | |
| Hindi Prize Yojana ® | 300.00 | | | | |
| Scholarships and Prizes | 2,200.00 | 17,802.00 | | | |
| **Pune Branch Expenses** | | | **By Hitguj Prakashan Income** | | |
| Vardhapan Din Function | 11,390.00 | | Advertisements | 6,200.00 | |
| Postage Expenses | 115.00 | | Transfer from Hitguj Nidhi | 101,498.00 | 107,698.00 |
| Printing & Stationery | 31.00 | 11,536.00 | By Vardhapand Din Income | | 1,500.00 |
| **To Hitguj Praskashan Expenses** | | | **By Transfer From** | | |
| Hitguj Printing (Mumbai Head Office) | 78,096.00 | | Anita Khambete Smruti Yojana | 1,600.00 | |
| Hitguj Postage (Mumbai Head Office) | 22,615.00 | | Hindi Prize Yojana | 300.00 | |
| Hitguj Postage (Pune Branch) | 727.00 | 101,438.00 | | | 1,900.00 |
| **To Income & Expenditure Account** | | - | | | |
| Deficit Being Excess of Income Over Expenditure C/F To Balance Sheet | | 9,133.75 | | | |
| | **TOTAL** | **1,44,909.75** | | **TOTAL** | **1,44,909.75** |

Note : The Headings as per the Prescribed Form which are absent in the above Statement Should be read As 'NIL'

**For MARATHE PRATISHTHAN**

Subject to our report of Even Date
**For HMA & Associates**
**Chartered Accountants**

Partner
Membership No. 103650

TRUSTEE TRUSTEE

Date : 17-06-2013

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**
**SCHEDULE VIII**
**[VIDE RULE 17 (1)]**

NAME OF THE PUBLIC TRUST : **MARATHE PRATISHTHAN** **REG. NO. E-7918 (BOM)**

**BALANCE SHETT AS AT... : 31ST MARCH, 2013**

| **FUNDS AND LIABITLIES** | **RS.** | **RS.** | **PROPERTY AND ASSETS** | **RS.** | **RS.** |
|---|---|---|---|---|---|
| **Kayam Nidhi** | | | **Investments** | | |
| Balance as per Last Balance Sheet | 1,94,545.00 | | Fixed Deposits With | | |
| Add : HitChintak | 5,00.00 | | Saraswat Co-op. Bank, Worli | 2,26,598.00 | |
| Add : Life Member | 2,900.00 | 1,97,945.00 | Cosmos Co-op. Bank, Dadar | 1,65,000.00 | |
| | | | Janata Sahakari Bank, Dadar | 1,82,542.00 | |
| | **TOTAL B/F** | **1,97,945.00** | | **TOTAL B/F** | **5,74,140.00** |

| | | |
|---|---|---|
| | **TOTAL B/F** | **1,97,945.00** |
| **<u>Kulvruttant Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 22,257.67 | |
| Add : Donation | 3,000.00 | |
| Add : Interest | 2,448.33 | 27,706.00 |
| **<u>Shikshan Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 5,71,753.46 | |
| Add : Donation | 20,000.00 | |
| | 5,91,753.46 | |
| Add : Interest | 62,892.54 | 6,54,646.00 |
| **<u>Sureshbhau Smruti Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 90,166.73 | |
| Add : Interest | 9,918.27 | 1,00,085.00 |
| **<u>Udyog Pravartan Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 70,944.29 | |
| Add : Interest | 7,803.71 | 78,748.00 |
| **<u>Vishishta Hetu Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,96,462.45 | |
| Add : Interest | 21,610.55 | 2,18,073.00 |
| **<u>Yuva Manch Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,817.26 | |
| Add : Interest | 199.74 | 2,017.00 |
| **<u>Udyojakta Paritoshah Nidhi</u>** | | |
| Donations During the Year | 24,445.71 | |
| Add : Interest | 2,689.29 | 27,135.00 |
| **<u>Vaidyakiya Madat Nidhi</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 45,998.46 | |
| Add : Interest | 5,059.54 | 51,058.00 |
| **<u>Hitguj Nidhi</u>** | | |
| Balance as per last balance Sheet | 2,40,625.39 | |
| Add : Subscription (MU) | 2,25,002.00 | |
| Add : Subscription (PU) | 25,500.00 | |
| Add : Collection (MU) | 42,101.00: | |
| Add : Interest | 26,468.61 | |
| Less : Transfer To I & E | (1,01,498.00) | 4,58,199.00 |
| **<u>Vinay Khambete Smruti Yojana</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 84,808.72 | |
| Add : Interest | 9,328.28 | 94,137.00 |
| **<u>Anita Khambete Smruti Yojana</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 16,822.05 | |
| Add : Interest | 1,849.95 | |
| Less : Transfer To I & E A/c | 1,600.00 | 17,072.00 |
| **<u>Ganesh Tantric Shikshan Yojana</u>** | | |
| Balance as per last Balance Sheet | 25,568.05 | |
| Add : Interest | 3,032.95 | 30,601.00 |
| | **TOTAL C/F** | **19,57,422.00** |

| | | |
|---|---|---|
| | **TOTAL B/F** | **5,74,140.00** |
| Jan Kalyan Sah. Bank, Dadar | 75,000.00 | |
| Jan Kalyan Sah. Bank, Dadar | 1,10,000.00 | |
| Jan Kalyan Sah. Bank, Sion | 3,36,034.30 | |
| UCO Bank, Pune | 9,06,289.00 | |
| U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 20,60,463.30 |
| <u>Interest Receivable</u> | | |
| <u>On Fixed Deposits With</u> | | |
| Jan kalyan Sah. Bank Ltd., Sion | 34,457.00 | |
| UCO Bank, Pune | 1,52,893.62 | 1,87,350.62 |
| **T. D.S. Receivable** | | |
| For 2011-2012 | 938.00 | |
| For 2012-2013 | 1,990.00 | 2,928.00 |
| **Cash and Bank Balances** | | |
| <u>Cash on Hand with</u> | | |
| Mumbai Office | 1,038.00 | |
| Pune Branch | 217.50 | 1,255.00 |
| <u>Cash at Bank with</u> | | |
| Saraswat Bank Ltd., Worli | 2,56,444.46 | |
| UCO Bank, Pune | 38,536.68 | 2,94,981.14 |
| **Loan From Udyog Pravartan Nidhi** | | |
| Mohan Marathe (Sangali) | 10,000.00 | |
| Mukund Marathe (Pune) | 13,000.00 | 23,000.00 |
| **Loan From Shikshan Nidhi** | | |
| Moreshwar Madukar Marathe (Pune) | 20,000.00 | |
| Swapnil Digamber Marathe (Vengurla) | 20,000.00 | |
| Ravindra R. Khambete (Mumbai) | 20.000.00 | |
| Mayuresh D. Marathe (Ichalkarnji) | 12.,500.00 | 72,500.00 |
| | **TOTAL C/F** | **26,42,478.06** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **TOTAL B/F** | **19,57,422.00** | | **TOTAL B/F** | **26,42,478.06** |
| **Hindi Paritoshik Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,706.24 | | | | |
| Add : Interest | 187.76 | | | | |
| Less : Transfer to I/E A/c | 300.00 | 1,594.00 | | | |
| **Vaidik Shikshan Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 23,509.05 | | | | |
| Add : Interest | 2,585.95 | 26,095.00 | | | |
| **Shourya Paritoshik Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,953.57 | | | | |
| Add : Interest | 493.43 | 4,447.00 | | | |
| **Pune Dainandini Yojana** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,59,976.04 | | | | |
| Add : Interest | 17,597.96 | 1,77,574.00 | | | |
| **Building Fund (Pune)** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,43,584.55 | | | | |
| Add : Donations | 2,501.00 | | | | |
| Add : Interest | 15,793.00 | 1,61,878.55 | | | |
| **Deposit For Hitguj** | | | | | |
| Received During the year | | 40,000.00 | | | |
| **Current Liabilities & Provisions** | | | | | |
| Audit Fees | 3747.20 | | | | |
| Contribution to Charity Comm. | 6,180.00 | | | | |
| Bakshis Anamat | 2,750.00 | 12,677.20 | | | |
| **Income and Expenditure Account** | | | | | |
| Balance as per Last Balance Sheet | 2,51,656.56 | | | | |
| Add : Surplus being excess of Income over Expenditure | 9,133.75 | 2,60,790.31 | | | |
| | **TOTAL** | **26,42,478.06** | | **TOTAL** | **26,42,478.06** |

Subject to Our Report of Even Date

Note : The Headings as per the prescribed
Form which are absent in the above
Statement should be read as 'NIL'

**For Marathe Pratishthan**

**Trustee** **Trustee**

**For HMA & Associates**
**Charterd Accountant**

Memebership No. 103650
Mumbai, Date 16-08-2012

## सहवेदना



आपले कुलबांधव श्री. नरहर कृष्ण मराठे सेवानिवृत्त रेल्वे अभियंता, रा. डोंबिवली यांच्या धर्मपत्नी कै. सौ. सुषमा नरहर मराठे यांचे वयाच्या ७६व्या वर्षी दिनांक १३.४.२०१३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. व त्या बहुश्रृत होत्या.

त्यांच्या पश्चात त्यांचे पती, दोन मुले, दोन सुना व चार नातवंडे असा मराठे परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. सौ. सुषमा नरहर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

प्रेषक : श्री. सुरेश वामन मराठे (पृ. ५०३), डोंबिवली

# माणुसकीची मर्यादा ओलांडणारा : प्रिन्स

**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे, (पृ.१२०)**

मयुरीने टेबलावर जेवणाची तयारी केली, पाने मांडली. आज तिने मुलांना आणि श्रीनिवासला आवडणारा खास मेनू तयार केला होता. श्रीनिवासला मेथीचे परोठे फार आवडायचे आणि मुलांना दुधी हलवा. सगळेजण जेवायला बसले, हसत-खेळत जेवणं चालू होती.

श्रीनिवासने विचारले, "पिंकी, केदार उद्या काय आहे, सांगा पाहू?" दोघंही गोंधळात पडली. पिंकी निरागसतेने म्हणाली, "पप्पा, उद्या संडे आहे. शाळांना सुट्टी आहे." श्रीनिवासने विचारले, "आणखी काय आहे? आठवा पाहू! नाही ओळखता येत दोघांना?"

दोघंही क्षणभर विचारमग्न झाली. पण काही आठवत नव्हतं. तशी पप्पांनी थोडा वेळ वाट पाहून 'हरलो' अशी कबुली द्यायला लावली. फुग्यातली हवा संपत आली म्हणजे फुगा जसा कमी कमी होत जातो तशी दोघांची तोंडे हिरमुसली आणि त्यांनी कबुली दिली, चेहऱ्यावर उत्सुकता होतीच.

पप्पा म्हणाले, "अरे पाडसांनो! उद्या तुमच्या लाडक्या पप्पा-मम्मीच्या लग्नाचा वाढदिवस, मॅरेज डे आहे. मी मम्मीला छानसं प्रेझेंट देऊन सरप्राईज करणार आहे. तुम्हा दोघांनाही ते फारच आवडेल."

मयुरीही खुश झाली, उद्याच्या स्वप्नात हरवून बसली. काय आणेल बरं श्री खास आपल्यासाठी? आतापर्यंत कमी का प्रेझेंट्स आणली आहेत आपल्यासाठी श्रीने? लग्नाचा वाढदिवस म्हटला की श्रीचा उत्साह उतू जात असतो. एखादा सण समारंभ, उत्सव साजरा करावा तसा थाट करतो. लग्नाचा पहिला वाढदिवस त्या दोघांनी कसा मनवला हे आठवताच तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. श्री मयुरीलाच घेऊन महाबळेश्वरला गेला होता. जसा काही त्या दोघांचा पुन्हा 'हनीमून'च होता. लग्नाच्या पहिल्या वाढदिवशी तीही 'मोकळीच'होती. 'जड भरलेली' नव्हती. त्यामुळे श्रीची तर धमालच होती. त्यांनी ठरवून त्यांना पाहिजे तेव्हाच योग्य वेळी मुलं होऊन दिली होती.

"मम्मी दुधीहलवा घाल ना आणखी, छान झालाय!" पिंकी मोठ्याने म्हणाली तेव्हा कुठे ही भानावर आली. श्रीने चिडवून म्हटले, "राणी सरकारांची तंद्री कुठल्या स्वप्नात हरवली होती? उद्याच्या प्रेझेंटबद्दल विचार करतेस का?"

मुलं तोंड धुवायला बेसिनपाशी गेली. तेव्हा ती हसत हसत श्रीला म्हणाली. "छे, रे मग सांगीन तुला एकांतात. मुलांसमोर नको."

मयुरीने सर्व कामे आवरली, पण तिचे मन तरंगत होते. उद्याच्या दिवसावर, एकीकडे कामे करता करता, फुलपाखरू जसे फुलावर बसते तसे तिचे मन उद्याच्या दिवसावर, उद्याच्या स्वप्नांवर अलगद येऊन बसत होते. लग्नाच्या वाढदिवशी श्रीची स्वारी मस्त रंगात असते. त्याला तिच्याविषयी वाटणारी अनावर ओढ, त्याची उताविळी, त्याने तिच्याकडे केलेली मागणी, तीही संकोच, लज्जा सोडून सर्वस्व देते... त्यांची होणारी इच्छापूर्ती...

...एखाद्या नवोढेसारखी ती उद्याच्या दिवसाची वाट पाहत होती. प्रेमरसात न्हाऊन निघायला आतुर झाली होती. श्रीच्या प्रेमाच्या वर्षावात ती चिंब होत होती. तृप्तीने, सुखाने त्यात भिजून जात होती.

नवीन लग्न झालेल्या प्रेमीयुगुलांना कधी एकदा लवकर रात्र होते असे वाटत असते. त्याप्रमाणे मयूरीही उद्याच्या रात्रीसाठी अधीर झाली होती.

...मयूरी दिसायला सुंदर होती. नाजुक, गोरीपान, नाकी-डोळी नीटस, स्वभाव शांत आणि (किंचित लाजाळू) होती. पण या सर्वांपेक्षा तिचा फॉर्म म्हणजे बांधा कमनीय, रेखीव होता. दोन मुलांची आई ती वाटत नसे; कुठेही शरीर सुटलेले नव्हते. त्यामुळे आकर्षक दिसायची. तिच्या बरोबरीच्या मैत्रिणी बाळंतपणात फॉर्म घालवून बसल्या होत्या त्यांना तिचा हेवा वाटायचा. त्या चेष्टेने चिडवायच्या, म्हणायच्या,"तू लग्न झाल्यावर, दोन मुलं झाल्यावरसुद्धा जशी पूर्वी होतीस तशीच आहेस बघ! जाडी अजिबात झाली नाही का बेढबपणा शरीरात कुठे आला नाही. कुठल्या महागड्या हेल्थ क्लबमध्येही जात नाहीस तरी शरीराचा इतका डौलदारपणा, बांधेसूदपणा कसा राखला? याचे गुपित, रहस्य सांग ना?"

...श्रीला ती खूप आवडायची, तिच्यावर फिदा असायचा तो, तिच्या 'फॉर्मचे' कोण कौतुक त्याला या 'फॉर्म'मुळे तुझ्यातला 'चार्म' टिकून आहे, असे म्हणायला. हनीमूनला सिमल्याला गेली असताना, सारखा तिच्या कमरेभोवती हातांचा विळखा टाकून असायचा, नेहमी तिला कमरेजवळ धरून ओढायचा, जवळ घ्यायचा. लटके लटके ती रागवायची तेव्हा म्हणायचा, "मग किती बारीक कंबर आहे तुझी, माझ्या हातात सहज मावते बघ! शर्मिला टागोरसारखी सिंहकटी आहे तुझी..."

कोवळ्या काकडीसारख्या, शेलाट्या मयूरीवर श्री फार लुब्ध असायचा! तिलाही श्रीचे वागणे खूप आवडायचे, श्रीचे बेभान होणे, बेहोष होणे तिला रुचायचे.

...तो काही सारखा बायकोपुढे गोंडे घोळणाऱ्यांपैकी नव्हता. बाहेरच्या जगात त्याचे कर्तृत्व खूप मोठे होते, स्वत:च्या हुशारीवर, हिंमतीवर तो शिकला सवरला. कर्तबगार झाला. शून्यातून विश्व उभे करावे तशी स्वत:ची फॅक्टरी काढली. बंगला, गाडी सर्व श्रीमंती त्याच्या पायाशी लोळण घेत होती. पण त्याला कधी या श्रीमंतीचा गर्व नव्हता, अहंकारी दर्प नव्हता. 'मी' हे सर्व केले अशी जाणीव नव्हती. परदेशी अनेकदा जाऊनही तिथे कायम राहावेसे त्याला वाटले नाही. त्यांचा संसार सुरळीत चालू होता. वेलीवर सुंदर दोन गोजिरवाणी फुलंही आली होती. चौकोनी कुटुंबाला काही कमी नव्हते. दृष्ट लागण्यासारखा संसार चालू होता.

...सकाळी दूधवाल्या भैय्याने दूध घातले तशी मयूरी उठली, चहा केला, दूध तापवले, केरवारा केला. आज रविवार असल्याने मुलांची शाळेची घाई नव्हती. श्रीलाही फॅक्टरीत जायचे नव्हते, एरवी सुट्टी अशी कधी त्याला नसतेच, रविवार असला तरी पाच-सहा तास तो फॅक्टरीत जाऊन काम करीत असे. पण आज लग्नाचा वाढदिवस म्हणून तो पूर्णवेळ, सबंध दिवस घरीच राहणार होता! तसे त्याने ठरवूनच टाकले होते.

श्रीने आणि मुलांनी दोघांनी हॉल सजविला, घरी पताका करून लावल्या, फुगे फुगवून लावले, लहानपणी गणपतीची सजावट श्री मोठ्या उत्साहाने करायचा, त्याच उत्साहाने आत्ता त्याने हॉलचे डेकोरेशन सुरेख केले. मयूरीने स्वत: आईसिंग केलेला केक मध्ये ठेवला. तिने केक आणि आईस्क्रीम्स बनवायचा कोर्स केला होता. त्यामुळे तिला स्वत:ला या गोष्टी फारच छान करता यायच्या.

...आज मयूरी वाढदिवसासाठी श्रीने तिला घेतलेली गुलाबी रंगाची साडी नेसली होती. हा गुलबाक्षी रंग तिच्या गौरकाय वर्णाशी जणू स्पर्धाच करीत होता. ही साडी तिला खुलून दिसत होती. गळ्यात नाजूक डिझाइनचा नेकलेस तिने घातला होता. कानात गुलाबी रंगाचे खडे असलेली बारीक झुंबरं घातली होती. केसात मोगऱ्याचा गजरा माळला होता. केदार आणि पिंकी, 'हाऊ स्वीट यू ममाऽऽऽ' उत्स्फूर्तपणे म्हणाले. श्रीही तिच्याकडे पाहातच राहिला... 'चाळीशी उलटली तरीही अजून किती कोवळी दिसते ही... निबरपणा असा अजून आलाच नाही.'

'हॅपी मॅरेज डे' टाळ्या वाजवून मुलांनी जल्लोष केला. चौकोनी सुखी कुटुंबातील सगळ्यांनी एकमेकांना केक भरविला. पप्पा म्हणाले, ''जस्ट अ मिनट, यू वेट फॉर ए सरप्राईज'' श्री गेस्टरूममध्ये चटकन गेला आणि मऊशार शालीत गुंडाळून एक गोंडस कुत्र्याचे पिलू आणले. दुपट्यात तान्ह्या बाळाला लपेटावं तसं ते भूभूचं पिल्लू मोठं गोड दिसत होतं. इवल्या इवल्या डोळ्यांनी जीभ बाहेर काढून अवतीभोवती बघत होतं. मयूरी एकदम 'हाऊ स्वीट अँड ब्युटिफूल यू आर' असे उत्स्फूर्तपणे म्हणते तोच श्रीने तिच्या हातात भूभूला देत 'हे घे माझे तुला सरप्राइज प्रेझेन्ट! आवडले ना?'' असे अत्यंत मृदू शब्दात, तिच्या डोळ्यांत पाहात विचारले. तिने भूभूचा पापा घेत मानेने हो म्हटले. मुलंही भूभूच्या अंगावरून प्रेमाने हात फिरवू लागली. श्रीने आणि मयूरीने मुलांना विचारले, ''याचे नाव काय ठेवायचे?'' मुले म्हणाली, 'प्रिन्स' कसं वाटतं? दोघंही एकदम उद्‌गारली, ''वा, छान आहे! आजपासून याला 'प्रिन्स' म्हणायचं.''

त्या वाढदिवसाच्या रात्री मयूरी आणि श्रीच्या सहवासात हा छोटा प्रिन्स भागीदार झाला. थंडी अधिक असल्याने मयूरीने प्रिन्सला बाळाप्रमाणे, कुशीत झोपवले. प्रिन्स निद्राधीन झाल्यानंतर तिने हळूच त्याला पलंगाखाली ठेवले. वर उबदार दुलई घातली. प्रिन्स मोठा होत गेला तरी त्याने मयूरीच्या बेडरूममधील आपला निवारा हलविला नाही. शेजघराच्या दाराशी रात्री बांधलेला असायचा. त्याचे डोळे मिटलेले असले तरी अधूनमधून कान हलविल्यावरून तो जागा असावा आणि आपले सुखसंवाद ऐकत तर नसावा असे मयूरीला उगीचच वाटायचे. कधी तिला, प्रिन्स हा आपल्या सुखमय प्रणयी जीवनाचा मूक साक्षीदारच आहे असे वाटायचे.

शिवाजी पार्कवर, चौपाटीवर किंवा फाईव्ह गार्डनला फिरायला गेल्यावर, तिथे येणारी छान छान कुत्री पाहून मुलं म्हणायची, ''पप्पा-मम्मी आपणही छानसा कुत्रा पाळू या ना!'' पण दोघांनी फारसे मनावर घेतले नव्हते. बंगला मोठा होता. त्यामुळे जागेची अडचण नव्हती, पैशाचा तर प्रश्नच नव्हता, मयूरीलाही कुत्र्याचा लळा होता. तिच्या माहेरी कुत्रा होता, विकी नावाचा. लग्न झाल्यावर महिन्याने ती पहिल्यांदा माहेरी गेली तेव्हा कोण आनंद झाला होता त्याला, सारखा मयूरीच्या मागे मागे असायचा, तिच्याकडून लाड कौतुक करून घ्यायचा आणि पुन्हा ती जायला निघाली तेव्हा तिला सोडेनाच, सारखा तिची पर्स आणि चपला घेऊन बसायचा, तिने त्याची समजूत घातली, गोड शब्दात विनवणी केली, लवकर परत येईल असं आश्वासन दिलं तेव्हा कुठे तिची सुटका झाली. हा सर्व प्रकार श्रीने पाहिला होता. त्याने तिची चेष्टाही केली होती, ''पाठराखीण म्हणून घेऊन चल आपल्या घरी थोडेदिवस''

कुत्रा पाळण्याविषयी श्रीला वाटायचं, नसती जबाबदारी कशाला, आपल्या हातून मुक्या प्राण्याची नीट काळजी घेतली जाईल की नाही, आणि आज अचानक कुणाच्या ध्यानीमनी नसताना श्रीने सर्वांना आवडेल असा कुत्रा आणला.

प्रिन्स घरात आल्यापासून घराला एक वेगळाच तजेला आला. वसंत ऋतुच्या आगमनाने वृक्षराजी बहरावी, याप्रमाणे सारा बंगला चैतन्याने बहरून गेला. लहान मूल घरात आल्यावर घर जसं हसायला, बोलायला लागतं, तसा तो बंगला प्रिन्सच्या आगमनाने सजीव झाला, सारेजण प्रिन्सचं कोडकौतुक करण्यात, त्याच्या लीला पाहण्यात दंग व्हायचे. त्याला अंघोळ घालायची, त्याला खायला-प्यायला द्यायचे. सकाळ-संध्याकाळ फिरायला न्यायचे याविषयी त्यांच्यात भांडणे होऊ लागली तशी मयूरीने प्रिन्सच्या कार्यक्रमांचा नंबर लावून दिला. पाळी लावून दिली आणि त्यांचा कार्यक्रम ठरवून टाकला.

त्यांच्या घरातलाच पाचवा मेंबर प्रिन्स झाला होता. त्याच्या गुणांनी सगळ्यांचा आवडता, लाडका झाला होता. प्रिन्सला जरा काही दुखलं-खुपलं की सगळ्यांना वाईट वाटायचं, ताबडतोब डॉक्टरी सल्ल्याप्रमाणे उपाय केले जायचे. घराच्या वातावरणात खुश होता. रूळला होता. मोठा भाग्यवान होता बेट्या! श्रीबरोबर, मयूरीबरोबर लहान मूल आईच्या मागे लागावे तसा तो मागे लागायचा, मोटारीतून जाताना 'प्रिन्स'लाही न्यावे लागायचे. गाडी भरधाव धावू लागली की गडी एकदम खूश, खिडकीतून जीभ बाहेर काढून पाहायचा, जणू पादचाऱ्यांना वाकुल्याच दाखवीत असावा, पाहा मी कसा ऐटीत, रुबाबात गाडीतून फिरतो ते! तुम्ही चाला, नाही तर गर्दीच्या बसची ताटकळत वाट पाहत राहा असे म्हणत असावा.

श्री फॅक्टरीतून आला की गाडीचा परिचित हॉर्न ऐकून प्रिन्स अक्षरश: नाचू लागायचा, श्रीने घरात पाऊल टाकताच त्याच्या हातातील सूटकेस तोंडात धरून जागेवर ठेवायचा, त्याला वाचायला पेपर आणि मॅगेझीन द्यायचा, मयूरीची एखादी हरवलेली वस्तू प्रिन्स सापडून द्यायचा, हुशार, तरबेज होता गडी. मालकावर, धन्यावर त्याचा फार जीव! बंगल्याची राखण उत्तम करायचा,

मयूरी गार्डनमध्ये चपला न घालता चुकून गेली तर हा तिच्या पायापुढे ठेवायचा. त्याच्या गुणांनी तो सर्वांवर करीत असलेल्या प्रेमामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकून घेतली. प्रिन्सचा विरंगुळा सर्वांनाच झाला होता. सर्वांनाच तो 'आपलासा' वाटायचा. श्रीने त्याचे कितीतरी फोटो कौतुकाने काढले होते.

आणि अचानक काय झाले कोणास ठाऊक? दुधात मीठाचा खडा पडावा त्याप्रमाणे त्यांच्या सुखी, प्रेमळ आणि भरल्या संसाराला दृष्ट लागली, आनंदी संसाराची घडी विस्कटली... संसाराची चाके उलटी फिरू लागली. होत्याचं नव्हतं झालं.

श्रीला जास्तीत जास्त पैसे मिळायला लागले, त्याची फॅक्टरी तेजीत चालू होती, जसे गुळाभोवती मुंगळे जमावेत त्याप्रमाणे त्याच्याभोवती मित्रमंडळी जमू लागली, त्यांनी श्रीला अनेक 'श्रीमंती' नाद लावले. श्रीमंती छंदाची गोडी त्याला वाटू लागली. रेसचा छंद, पत्ते खेळणे, ड्रिंक घेणे श्रीचे जोरात वाढले. पूर्वी कधीही पार्टीला न जाणारा श्री आताशा रोज पार्टीला जाऊ लागला. प्रमाणाबाहेर मद्याचे अतिसेवन करू लागला. रात्री-अपरात्री घरी परतू लागला. मयूरी रोज रात्री जेवायला त्याच्यासाठी ताटकळत बसायची, श्री बाहेरून खाऊन-'पिऊन' यायचा त्याचे लक्ष कुठेही नसे. उडवाउडवीची उत्तरे द्यायचा. मयूरीशी पूर्वीप्रमाणे बोलायचा नाही, मोकळेपणी चेष्टा करायचा नाही, काही सांगायचा नाही.

एकदा तर श्रीने कहरच केला. अपरात्री त्याने ड्रिंक प्रमाणाबाहेर घेतल्याने त्याला मिसेस खन्ना आणि मिस परेरा यांनी खांद्याला धरून घरी आणून सोडले, त्यांना नशेतच त्याने लाडे लाडे 'थँक यू' - 'सी यू स्वीटीज थँक यू व्हेरीमच' म्हटले आणि मयूरीकडे उपहासाने पाहत म्हटले, बघ किती काळजी घेतात माझी, किती जपतात मला, घरापर्यंत सुखरूप आणून सोडले.''

दुसरी एखादी स्त्री मयूरीच्या जागी असती तर तिला हा अपमान सहन न होऊन ती चिडली असती, रागावली असती. पण मयूरी शांत राहिली.

एकदा न राहवून त्याच्या खांद्यावर डोळे ठेवून तिने त्याला अजीजीने विचारले, ''तुला काही होते आहे का, तुला काय झाले आहे? पूर्वीसारखा वागत नाहीस, बदलला आहेस. कसले दु:ख आहे तुला?'' तिने न राहवून काकुळतीने सांगितले, ''नशा हळूहळू जास्त वाढत चालली आहे. थोडा कंट्रोल ठेवा, चांगली लक्षणं नाहीत ही... तब्येतीवर वाईट परिणाम होतील. मुलांवर वाईट संस्कार होतील.''

पण तो घुम्यासारखा ढिम्म बसून राहायचा, क्वचित मूड असला तर मुलांशी तुटक बोलायचा, मुलांनाही पप्पांच्या वागण्यातला बदल समजू लागला. ती मम्मीला जाब विचारायची, ''हल्ली पप्पा पूर्वीसारखे का वागत नाहीत? त्यांची प्रकृती बरी नाही का?'' मयूरी निरुत्तर होती. मुलांना पप्पाचे हे विचित्र वागणे अजिबात पसंत नव्हते. पप्पांना भेण्यासाठी रात्री ती ताटकळत बसून वाट पाहात. परवा उशीरा रात्री पप्पा आल्यावर मुलांनी व्याकुळतेने, व्यथित अंत:करणाने विचारले, ''पप्पा तुम्हाला कसला त्रास होतो आहे का? कोणती चिंता मागे लागली आहे का? एनी प्रॉब्लेम? आम्हाला तो सांगा, आम्ही वाल्या कोळ्याच्या बायकामुलांप्रमाणे न वागता, तुमच्या दु:खात 'वाटेकरी' होऊ''

मुलांच्या तोंडचे हे समंजस बोल ऐकताच मयूरीला आतून गदगदून आले. पण श्री कोरडा, ठणठणीत होता. नशेने त्याच्यावर सत्ता गाजवली होती. मुलांचे शब्द त्याच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचत नव्हते. नशेने त्याच्यावर संपूर्ण कब्जा घेतला होता. त्याच्यातला 'श्री' संपला होता, राहिला होता तो फक्त नशेच्या स्वाधीन, आहारी गेलेला अचेतन देह!

घरातल्या सुतकी वातावरणात 'प्रिन्स'चाही कोंडमारा होऊ लागला. हसणारं, खेळणारं घर 'शापित' वाटू लागलं. त्याच्यात बदल झाला. पूर्वीसारखा तो नाचाबागडायचा नाही, एकाच जागी तासन् तास कोठेतरी टक लावून स्वस्थ पाहात बसायचा. शून्यात हरवल्यासारखी त्याची नजर दिसायची, त्याचा उत्साह गेला. एकाएकी तो आजारी, अपंग असल्यासारखा दिसू लागला. मनातून प्रिन्स खंतावू लागला. शाळकरी मुलाला लांब हॉस्टेलवर ठेवल्यावर तो जसा घरच्या, आईच्या आणि भावंडांच्या आठवणींनी झुरावा तसा प्रिन्स झुरू लागला. त्याच्या हालचालीतला संथपणा मयूरीला पाहवेना. ती त्याला मायेने थोपटायची, गोंजारायची, पण त्याचा काही उपयोग होत नसे. तो सारखा काहीतरी 'शोधत' असल्यासारखा व्याकूळ दिसे. श्रीच्या स्पर्शासाठी प्रिन्स आसुसलेला असे, श्रीच्या मायेने ओथंबलेला, प्रेमात भिजलेला हात त्याच्या पाठीवरून हळुवार फिरत असे. त्या स्पर्शातील सुखाची अवीट गोडी प्रिन्सने चाखली होती आणि आता त्याच मालकाने दगडी चेहऱ्याने वावरणे, पूर्णपणे दुर्लक्ष करणे ह्याचे त्याला सुखाचे निधान हातून निसटावे तसे दु:ख होत होते. या प्रकाराने प्रिन्सने हाय खाल्ली, निराश, उदास फार कष्टी दिसायची. जणू काही प्रिन्स घरात नाही अशा पद्धतीने तो वागू लागला.

पूर्वी एकदा तर प्रिन्सने कमालच केली होती. श्रीला अचानक कामासाठी परदेशी जावे लागले, तेव्हा प्रिन्स दूध-पावला स्पर्श करेना. रोज नेमाने न चुकता श्री त्याला दूध-पाव भरवीत असे. मुलांनी आणि मयूरीने किती प्रयत्न करून पाहिले. पण त्यांच्या हातून तो खाईना, श्री नाही म्हणून एखाद्या हट्टी मुलाप्रमाणे रुसला होता गडी. मयूरीचा, मुलाचा निरुपाय झाला. तिकडे पोहोचल्यावर श्रीचा घरी फोन आला, त्याने प्रिन्सचीही आस्थेने चौकशी केली, तेव्हा मयूरीने तो दूध-पाव खात नसल्याची, तुमची सवय आहे त्याला अशी तक्रार केली, तेव्हा श्रीने प्रिन्सच्या कानाशी फोन लावायला सांगितले आणि म्हटले, ''शहाणा माझा राजा, समंजस माझा बेटा... मी घरी येईपर्यंत तुला मयूरी दूध-पाव देईल तेव्हा नाराज होऊ नको, माझं ऐक, मी तुला आवडतो ना? दूध-पाव खात जा'' श्रीने खा म्हटल्यावरच तो खात असे. आणि काय आश्चर्य श्रीच्या फोनवरच्या नुसत्या बोलण्याने ज्याने दूध-पावकडे पाठ फिरवली होती. तो आता निमूटपणे, आज्ञाधारकपणे, मुकाट्याने दूध-पाव खात होता. मयूरी, मुले कौतुकाने, स्तिमित होऊन प्रिन्सकडे पाहत होती. श्रीच्या शब्दांनी काय जादू केली न कळे!

एखादा भुंगा जसा लाकूड पोखरतो तसे तिचे घर हळूहळू पोखरू लागले. श्री नशेच्या आहारी इतका कसा गेला याचं मयुरीला फार आश्चर्य वाटायचं, कोडंच पडायचं तिच्यापुढे... मयुरीला हा आघात सहन होईना. वादळवाऱ्यात एखादी वेल उन्मळून पडावी तशी ती पार

कोलमडून गेली. माझ्या वाट्याला हा भोग का यावा? गेल्या जन्मी काय पातक केले म्हणून दुर्दैव मागे लागले. तिची प्रकृती क्षीण होत चालली. पण तिने त्यावरही मात करायचे ठरवले.

श्रीने तिच्या संसारावर घातलेला घाव तिला पेलायचा होता, तिच्यात वेगळीच ताकद निर्माण झाली. ज्यामुळे मुलांना ती हिम्मत देऊ शकेल. कोसळत्या घराला आधार देऊ शकेल. आहे त्या परिस्थितीला सामोरं जाणं एवढचं तिच्या हाती होतं.

परिस्थिती बदलण्याचं सामर्थ्य तिच्यात नव्हतं, ती परिस्थितीला शरण आली होती. श्रीला मार्गावर आणण्यात ती अपयशी ठरली होती. नापीक जमिनीत बी टाकले तर पीक येत नाही तशी श्रीची अवस्था होती. श्रीला परोपरीने समजावण्याचे प्रयत्न व्यर्थ ठरत होते.

मनाची घालमेल सगळ्यांचीच होत होती. पण त्यालाही मूलं बाह्यत: ॲडजेस्ट झाली होती. पप्पांच्या अशा वागण्याने मम्मीला किती यातना होत असतील हे समजून पूर्वीपेक्षा मम्मीवर प्रेम करीत होती. तिचा शब्द फुलासारखा झेलत होती. त्यांची आपापसातील भांडणेही कमी झाली होती. जणू बाळपण विसरून लवकरच प्रौढपणा अंगी आणला होता. मयुरीही पैशांच्या आर्थिक बाबतीत जास्त सावध, सतर्क झाली होती. ठेव सुरक्षित ठेवीत होती.

तरीही, न राहवून दुसरे दिवशी सकाळी ब्रेकफास्टच्यावेळी वरकरणी हसतच त्याला विचारले, ''श्री, आतापर्यंत तू स्वत:ला सावरून सर्व काही करीत होतास. स्वत:चा तोल कधी ढळू दिला नाहीस. परंतु काल मात्र तुझा तोल गेलेला होता. इतका की तुझ्या 'स्वीट' मैत्रिणींनी तुला दोन्ही बाजूंनी आधार देऊन घरी माझ्या सुपूर्त केले. त्यांच्या तू सर्वस्वी आहारी तर गेला नाहीस ना?''

श्री मधला 'पुरुष'दुखावला गेला. त्याने तिला कुत्सितपणे, 'एक धाव दोन तुकडे' पद्धतीने उत्तर दिले.

''केवळ काही काळ सहवासात आल्यामुळे त्या दोन स्त्रियांशी माझा शारीरिक संबंध जोडू इच्छितोस! तुझ्या हीन प्रवृत्तीची मला किळस वाटते. आता मी तुला दोन-तीनदा आपल्या पोस्टमनला चहा देऊन त्याच्याशी अघळपघळ गप्पा मारताना पाहिले आहे. त्याचा अर्थ तुझे त्याच्याशी शारीरिक संबंध आहे असा काढला तर तुला कसे वाटेल?''

''तेव्हा स्टॉप धीस नॉन्सेन्स'

परंतु पुढे पुढे, अनेकदा नवनवीन मैत्रिणींचा 'आधार' घेऊनच अपरात्री तो परतू लागला. त्यावरून त्यांचे बेडरूममध्ये शाब्दिक खटकेही उडू लागले. एका रात्री नशेत तर्रर असलेल्या स्थितीत त्याने मयुरीला सांगितले, ''थोडे दिवस थांब, मी वेगळाच राहणार आहे. माझा तुला त्रास नको, तुझी मला अडचण नको.''

त्या दिवसापासून एका खोलीतच निजणारे परंतु 'विभक्त' असणारे जोडपे अशा त्यांच्या रात्री जाऊ लागल्या.

श्री मध्यरात्री नंतरच नशेत घरी येऊन पलंगावर मुडद्यासारखा झोपायचा. मयुरी त्याची वाट पाहत जागी असायची. अनेक रात्री तिने अशा जागून काढल्या. तिला श्रीबद्दल नुसता रागच नव्हे, तर असूया वाटू लागली. तो ढाराढूर निवांत झोपायचा आणि ही मात्र एकटी डोळ्यांची पापणीही न हालवता उघड्या डोळ्यांनी जागत राहायची.

पण एके रात्री तिच्या लक्षात आले, ती एकटीच जागत नव्हती तर प्रिन्स बेडरूमच्या दाराशी बसून झोप काढण्याऐवजी पहारेदारासारखा चक्क उभा असायचा.

प्रिन्सला बोलता येत नव्हते, पण त्याला सर्व काही समजत होते हे तिला जाणवले. तिच्या बहरलेल्या प्रणयी जीवनातील ओहोटी त्याच्या नजरेतून सुटलेली नव्हती. तिच्याबरोबरच तोही मूक प्राणी अधिकाधिक व्याकूळ होत गेल्याचे जाणवले. कारण पहाटेच्या प्रहरी मधूनच तो केविलवाणे चित्कार काढायला लागला. त्यातून त्याची खंत व्यक्त होत होती. तर, कधी प्रिन्स निद्राधीन झालेल्या श्रीचे पांघरूण ओढण्याचा प्रयत्न करायचा. श्रीवर त्याचा काहीच परिणाम होत नाही असे लक्षात आल्यानंतर प्रिन्सने काही वेळ मयुरीची साडी तोंडात धरून तिला श्रीकडे नेऊ लागला. अर्थात मयुरी त्याला एक चापट मारून हाकलून देई. तेव्हा 'कुईऽऽकुई' आवाज करीत आपल्या जागेवर परतायचा. श्री आणि मयुरीला एकत्र आणण्यात तो अपयशी झाल्याची खंत त्याला जाणवत असावी.

थोड्याच दिवसात श्रीने आपली धमकी खरी केली. तो नगरातील दुसऱ्या एका विभागातील ब्लॉकमध्ये स्वतंत्र राहू लागला. मयुरीला तर तो काडीची किंमत देत नव्हता. पण नववीत शिकणाऱ्या आणि पुरेशी जाण असलेल्या पिंकीच्या लडिवाळ रागवण्यालाही त्याने दाद दिली नाही. मग सातव्या वर्गात असणाऱ्या आणि अभ्यासापेक्षा खेळातच जास्त रमत असणाऱ्या केदारने केलेली कुरकूर त्याच्या ध्यानातही कशी यावी? प्रिय (?) पत्नी आणि दोन गोजिऱ्या मुलांच्या भावनांची कदर न करणाऱ्या श्रीला प्रिन्सच्या व्यथित भावनांची बोच लागणे कसे शक्य होते?

घटस्फोट न घेताही श्री आणि मयुरी 'विभक्त' झाले होते. मयुरीने मनातल्या मनात झुरत परंतु लौकिदृष्ट्या तटस्थ भूमिकेने आपले जीवन पूर्ववत चालू ठेवले होते. दोन्ही मुलांनाही आता पंख फुटू लागल्याने ती आपपल्या विश्वात रममाण झाली. पप्पा आणि मम्मीतला विभक्तपणा त्यांनी सहजपणे पचविला होता. त्यांच्या वागण्यात तिळमात्रही खंत आढळत नव्हती.

पण प्रिन्स मात्र दिवसेंदिवस अधिकच खंतावत गेला. त्याचे खाणे-पिणे कमी कमी झाले. घरातील आणि बागेतील त्याचे बागडणे केव्हाच बंद झाले होते. अलीकडे तर प्रिन्सने मयुरी, पिंकी आणि केदार यांची दखल घेणेही सोडले होते. पूर्वी या तिघांपैकी कोणीही जवळ आल्यास तो आनंदाने आपली शेपटी हलवीत, त्यांच्या अंगचटीला जायचा. त्यांना प्रेमाने चाटायचा. पण शेवटी त्याने आनंदाने शेपटी हलवणे बंद केले. त्या घरात तो दु:खी अंत:करणाने कसेबसे जगत होता एवढेच. पण त्याच्या जीवनात काही त्राण उरला नव्हता.

मानवी देह असलेल्या परंतु कौटुंबिक प्रेमबंधन पूर्णपणे विसरलेल्या श्री, मयुरी आणि पिंकी-केदार आपापल्या व्यक्तिगत जीवनात रमलेले दिसत होते.

आणि काय आश्चर्य! कुत्र्याचा देह असलेल्या परंतु जणू प्रेमभावनेवरच श्वासोच्छ्वास करीत असलेला प्रिन्स मात्र जीवनातील स्वारस्य गमावून बसला होता.

त्या दिवशी, दुपारी भोजनोत्तर विश्रांती घेत मयुरी नेहमीप्रमाणे तिची आवडती आकाशी रंगाची साडी टापटिपीने नेसून हातात बॅडमिंटनची रॅकेटस

घेऊन वनिता मंडळात जायला निघाली.

दाराशी असलेल्या प्रिन्सने तिच्याकडे स्नेहाच्या आर्त अपेक्षेने टक लावून पाहिले; पण आपल्याच नादात असलेली मयुरी रॅकेट हलवत प्रिन्सकडे कटाक्षही न टाकता आवाराबाहेर निघाली.

थोड्यावेळाने शाळेतून पिंकी आणि केदार परतले. त्यांची चाहूल लागताच प्रिन्स कान टवकारून पटकन उभा राहिला. त्यांचे लक्ष वेधले जावे म्हणून मंद आवाजात भुंकू लागला.

पण प्रिन्सकडे लक्ष द्यायला त्यांना तरी फुरसत कुठे होती? आपल्या रूममध्ये दप्तरे टाकून स्वयंपाकघरात त्यांच्यासाठी ठेवलेले फराळाचे पदार्थ खाऊन आपापल्या मित्रमैत्रिणींकडे खेळण्यासाठी पसार झाले.

प्रिन्स आता हताश झाला. दाराशीच पेंगुळला...!

सायंकाळी मयुरी परतली आणि सरळ स्वयंपाकाला लागली.

थोड्या वेळाने केदार परतला. दाराशीच झोपलेल्या प्रिन्सला येता-येता पायाने त्याने स्पर्श केला. प्रिन्स किंचित कलंडल्यासारखा वाटला पण तो उठला नाही.

पिंकी घरी आली, तिन्हीसांजा झाल्या तरी प्रिन्स दाराशीच कसा याचे तिला आश्चर्य वाटले. म्हणून तिने जवळ जाऊन निरखून पाहिले. प्रिन्सची जीभ बाहेर आली होती. डोळे उघडे होते. पण त्यात त्राण दिसत नव्हता. त्याचे कान पडलेले होत. तिला हे दृश्य वेगळेच वाटले. तिने एकाच वेळी मम्मीला आणि केदारला जोरात हाक मारले. तिघेही प्रिन्स जवळ उभे राहिले. श्री तर कधीचाच या चौकडीपासून दूर दूर गेला होता.

मयुरीने त्याला हलविले तरीही प्रिन्सने हालचाल केली नाही... तेव्हा प्रिन्स आपल्याला सोडून गेला, असे ती दुःखाने आवंढा गिळत म्हणाली.

"मम्मी प्रिन्स कशाने मेला असेल?" दोघांनी एकदम विचारले. प्रिन्सच्या मृत्यूचे कारण त्यांच्या आकलनाबाहेर होते.

पण मयुरीला त्याची हृदयात कोठेतरी वेदना निर्माण करणारी जाणीव झाली. कारण वरकरणी जरी तिने श्रीचा विभक्तपणा पचवल्याचे नाटक केले होते तरी तिच्या हृदयात कुठेतरी सल खुपत होती. पण तरीही ती 'जिवंत' होती.

पण त्याच वेदनेचा अतिरेक होऊन प्रिन्स हे जग सोडून गेला होता. त्या मुक्या जीवाला कुटुंबातील ताटातूट पाहवली नाही.


**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**,

(पृ.१२०)

८/१३, सहकारनगर, वडाळा,

मुंबई ४०००३१,

फोन नं. : ०२२-२४१५०८८९


## वाचकांचा पत्रव्यवहार

आपला हितगुजचा मार्च २०१३चा अंक मिळाला. अपेक्षा नव्हती. मी २००० रु. न पाठवायचे कारण! का पाठवले नाहीत तर

१. हितगुज सामान्य 'मराठे' गोत्रजांच्या अपेक्षा पूर्ण करत नाही.

२. प्रतिष्ठान व हितगुज एकच आहेत हे 'भावत' नाही. (आपले ब्रीद 'परस्परं भावयन्त' आहे ना?)

पहिला मुद्दा लक्षात आला का सविस्तर सांगू?

अ. पृष्ठ ८वर गजाजन भास्करांचा फोटो हितगुजने घ्यायला हवा

ब. मागील संपादक ज्या कळकळीने, प्रेमाने हितगुज चालवत होते तसा अंक आता निघत नाही, त्यांना कधी संपादक म्हणून फोटो छापायची गरज वाटली नाही.

क. सुरुवातीला तुम्ही इतर लेखकांचे फोटो ही देत होता. त्यानंतर ते आवश्यक वाटले नसतील.

ड. मध्यंतरी ब्राह्मण वर्गाकरिता, 'उद्योजक' बनवण्यासाठी योजना वर्तमानपत्रात आली. त्याचा हितगुजमध्ये मागोवा घेतला नाही. हे संपादकाचे काम आहे असे पूर्वसुरींच्या संपादकांचे कार्य बघून मला वाटते. आपले रिवाजांविषयी, चालीरितीविषयींची चर्चा आवश्यक आहे. मी खोलवर विचार केला तेव्हा ब्राह्मणांची स्थिती अरत्री ना परत्री झाली आहे. कित्येक ब्राह्मण कुटुंबांची वाताहात होताना दिसत आहे. (होय! आम्ही गेली दहा वर्षे थोडेफार समाजासाठी महाराष्ट्रात जाऊन (कोकण/मराठवाडा) ठिकाणी कार्यानुभव आहे. आम्ही उभयता ठराविक अंतराने वर्ष- दोन वर्षे कार्यासाठी देतोच) थोडक्यात काय तर माणसाची शेपूट का? गळून पडली तसे हितगुजचे न होवो.

परत एकदा २०००/- न पाठवता अंक पाठवला त्याबद्दल आभार!

- मनोहर दामोदर मराठे, अंबरनाथ

## सहवेदना

कै. श्री. बाळकृष्ण गणेश मराठे, (तुळस, फातरवाडा) यांचे वयाच्या साठाव्या वर्षी ७ डिसेंबर २०१२ ला हृदयविकाराने निधन झाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. बाळकृष्ण गणेश मराठे यांना हार्दिक श्रद्धांजली.

**विशेष सूचना : 'हितगुज' राखीव फंड निधी शक्यतो चेकद्वारे 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावा. तसेच मराठे प्रतिष्ठानची सारस्वत कॉपरेटिव्ह बँक, वरळी शाखा, अकाऊंट नंबर : ०१०२००१०००२२४४८ IFSC CODE : SRCB0000010 असा आहे. येथे फंड निधी जमा करा. जमा केल्यास आपले नाव कळवावे.**

# ते भयानक दोन तास

-जयंत मराठे, पुणे

रात्रीचे दीड वाजले होते आणि अगदी अचानक श्रीधरन यांच्या घरातील एक कधीही न वाजलेला फोन वाजू लागला. श्रीधरन भारतीय अवकाश संस्थेचे (इस्रो) व्यवस्थापकीय संचालक होते. भारतीय अवकाश संस्थेचे सर्व संशोधन कार्यक्रम त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असल्याने त्यांच्याबद्दल त्यांच्या सर्व दिनक्रमाबद्दल गुप्तता होती. भारताची उपग्रह मोहीम. शुक्रग्रहासाठीची मोहीम. शुक्रग्रहासाठीची मोहीम व अतिशय वेगवान अशा नवनवीन अस्त्रांचे संशोधन संरक्षण खाते व अवकाश संस्था यांच्या सहकार्याने गुप्तपणे चालू असल्याचे कोणालाच माहीत नव्हते आणि अशा वेळी 'नासा'शी कनेक्ट असलेला हा हॉट लाईन फोन आज प्रथमच वाजत होता. केवळ टेस्ट चेक साठी दर तीन महिन्यांनी त्यांची घंटा खणखणायची पण ती दिवसाउजेडी.

श्रीधरन यांच्या पत्नीही जाग्या झाल्या इतक्यात 'इस्रो' च्या सुरक्षा अधिकारी यांचा फोनही त्यांच्या नेहमीच्या टेलिफोनसेटवर आल्याचे त्यावरील जांभळ्या लाईटमुळे स्पष्ट झाले. सौ. श्रीधरन यांनी तो फोन घेतला. प्रमुख सुरक्षाअधिकारी निवृत्त ब्रिगेडिअर कश्यप फोनवर होते. त्यांनी श्रीधरन यांच्यासाठी नासातून हॉट लाईनवर कॉल येणार असल्याचे सांगितले. पण तो कॉल आलेलाच होता. श्रीधरन यांनी हॉट लाईन फोन उचलला. पलीकडून नासचे प्रमुख हेन्री गिल्बर्ट यांची सेक्रेटरी 'मेरी' बोलत होती. ''आपण श्रीधरन बोलत आहात काय? आपणास इतक्या रात्री फोन केल्याबद्दल क्षमस्व, पण नासाचे प्रमुख आणि माझे बॉस गिल्बर्ट यांना अतिमहत्त्वाच्या घटनेबद्दल आपल्याशी बोलायचे आहे. फोन ट्रान्सफर केल्याचा आवाज श्रीधरन यांनी टिपला. पलीकडून गिल्बर्ट यांचा गंभीर आवाज 'हॅल्लो' शब्दातूनच लक्षात आला. श्रीधरन यापूर्वी दोनदा गिल्बर्टना भेटले होते. त्यामुळे त्यांनी आवाज लगेच ओळखला, ''श्रीधरन आपणांशी प्रथमच हॉट लाईनचा उपयोग करून संपर्क साधत आहे. गिल्बर्टनी विषयालाच हात घातला. नासाच्या पृथ्वीच्या हालचाली विशेषत: पृथ्वीचे स्वत:भोवती (रोटेट) फिरताना होत असणारे बदल त्या बाबतचे निरीक्षण आमच्या अवकाशातील प्रयोगशाळेच्या माध्यमातून नोंदले जाते. आणि गेल्या २४ तासात असे दिसून आले आहे की पृथ्वीच्या स्वत:भोवती फिरण्याच्या गतीत लक्षणीय बदल होणार असून आत्ता हातात आलेली अगदी ताजी माहिती अशी आहे, की पृथ्वीचे स्वत:भोवती फिरणे एकदम मंदावयाला लागले असून कदाचित पृथ्वी दोन एक तास फिरायची थांबणार आहे. त्यामुळे तुमच्याकडे सूर्य दोन तास उशिरा उगवेल. याचे भयानक परिणाम दक्षिण व उत्तर ध्रुवाजवळील देशात होणार आहेत. आम्ही जपानसह जवळच्या देशांची व त्यातील प्रमुख शास्त्रज्ञांची बैठक आतापासून एक तासाने बोलाविली आहे. आपल्या पंतप्रधानांनाही आमच्या परराष्ट्रमंत्र्यांनी हॉटलाईन वरून संदेश दिला आहे. मिस्टर श्रीधरन देशत या अभूतपूर्व समस्येने गोंधळ उडू नये यासाठी आपण पंतप्रधानांसह इतर निरनिराळ्या हवामान व वातावरण संबंधातील ज्येष्ठ शास्त्रज्ञांना घेऊन इमर्जन्सी बैठक घेऊन पावले उचला. मी स्वत: रशिया, ब्रिटन, जपान, फ्रान्स, जर्मनी, चीन, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ब्राझिल, अर्जेंटिना, इजिप्त, साऊथ आफ्रिका या देशाशी संपर्क साधला आहे. पृथ्वीवर भयानक संकट येऊ घातलंय त्यातून आपणास मार्ग काढायचा आहे.''

श्रीधरन फोन संपताच थोडावेळ अवाक्‌च झाले, पण त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी होती. त्यांनी ताबडतोब प्रमुख सुरक्षा अधिकारी कश्यप यांना बोलावून घेतले. सर्व ज्येष्ठ शास्त्रज्ञांना पुढच्या पंधरा मिनिटांत इस्रो कॉन्फरन्स व सीक्रेट हॉलमध्ये जमण्याबद्दल कळविण्यास सांगितले. त्याचेवळी थेट पंतप्रधानांच्यासाठी असलेल्या हॉट लाईनवर त्यांनी पंतप्रधानांशी संपर्क साधला. पंतप्रधानांनी या वेळेपर्यंत कॅबिनेट मंत्री व प्रमुख सचिव यांची तातडीची बैठक बोलावली होती. पंतप्रधान कार्यालयातून सर्व राज्याच्या मुख्यमंत्र्यांना कळविण्यात आले होते. 'नासा'चा ई-मेल सर्व राज्याच्या मुख्यमंत्री व सचिवांना पाठविला होता. बीबीसीचे इमर्जन्सी बातमी पत्रातून हे स्पष्ट झाले की पृथ्वीचे स्वत:भोवती फिरणे थांबले होते. काही राष्ट्रातून तसे चिंतेचे संदेश येऊ लागले होते. घड्याळाचे काटे पुढे सरकत होते. पण सूर्य तारे आहेत त्या ठिकाणी स्थिर वाटत होते, उत्तर ध्रुवाजवळील राष्ट्रामधून वातावरणात थंडीचा दिवसातील कालावधी वाढण्याच्या दडपणामुळे पुढे काय घडणार अशा विचारणा नासाकडे येऊ लागल्याची बातमी दिली जात होती. खुद्द इंग्लंडमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे व हवामानात वेगाने होत असल्याचे सांगितले गेले.

केंद्र सरकारच्या मार्फत मुख्यमंत्री व सर्व सचिव यांना परिस्थिती हाताळण्याचे संदेश आले होते मुंबई व पुणे विमानतळ येथील प्रवाशांना आलेल्या संकटाची माहिती देण्यात आली. सकाळी सात वाजताही गडद अंधार राहील व ही स्थिती पुढील एक तासापर्यंत राहण्याची किंवा वाढण्याची शक्यता आहे असे वारंवार प्रसारित करण्यात येऊ लागले. सर्व प्रमुख टीव्ही चॅनेल्सनी आपले नेहमीचे कार्यक्रम थांबवून पृथ्वीवर व भारतात काय परिस्थिती आहे ते प्रसारित करण्यास सुरुवात केली. शहरातील शाळा व सर्व बस वाहतूक यांना सूर्याच्या उशीरा उगवण्याबद्दल व हवामानांत विचित्र बदल होतील याची सूचना देणे सुरू केले. समुद्राकडील बंदरातून खास धोका दर्शविणारी यंत्रणा सुरू केली. मच्छिमार जे समुद्रावर होते त्यांना परिस्थितीची कल्पना देण्यात येऊन सुरक्षित परत येण्याची व्यवस्था सुरू केली गेली. सागरी वातावरणावर काय परिणाम होणार याचा काहीच अंदाज करता येत नव्हता. शहरांतून कारखाने चालू ठेवण्यात आले; पण कामगारांना कामाच्या ठिकाणीच पृथ्वीवर व पर्यायाने देशावर आलेल्या संकटाची माहिती दिली. सर्व देशभर सूर्योदयाची वेळ होऊन गेल्यावरही अंध:कार होता. आकाशांतील ग्रह तारे स्पष्ट दिसत होते. ज्या

रेल्वे धावत होत्या त्यांना नजिकच्या स्टेशनवर थांबवून त्यातील प्रवाशांना परिस्थितीची माहिती दिली. संचार व्यवस्थेवर दबाव वाढल्याने मोबाईल काम करेनासे झाले. दूरध्वनी यंत्रणा बऱ्यापैकी काम करीत होती. पण हवेत प्राणवायूचे प्रमाण कमी होईल असे टीव्हीवाहिन्यावरून दाखविले जाऊ लागले. शासकीय यंत्रणा, पोलीस व लष्कर तिन्ही दले आपत्ती व्यवस्थापनांसाठी बोलावण्यात आली. हॉस्पिटल्सना सज्ज राहण्यास सांगण्यात आले.

बीबीसीच्या बातम्याप्रमाणे आफ्रिका खंडातील अनेक देशात जबरदस्त गोंधळाचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. लॅटिन अमेरिकन देशात व मेक्सिकोत मय - संस्कृतीच्या डिसेंबर २०१२ पृथ्वीचा शेवट या कॅलेंडरमधील सत्य प्रत्यक्षात आले आहे असे वाटून लोकांच्यात प्रचंड घबराट निर्माण झाली होती. प्रशासकीय यंत्रणा कोलमडली होती. मृत्यूच्या व शेवटच्या भयाने प्रचंड कोलाहल माजून मृतांची संख्या जबरदस्त झाली. जगभर हलकल्लोळ माजला होता. पण थांबविणार कोण? शहरातून, खेड्यापाड्यातून लोक देवळात जमले. काहीनी प्रार्थना सुरू केल्या. नास्तिक आस्तिक बनले. विज्ञानाला लगेच उत्तर सापडत नव्हते. शेवटाच्या कल्पनेने कित्येक कमकुवत हृदयवाल्यांचे प्राणोत्क्रम झाले. प्राणी, पक्षी यांना वितरित घडतंय याची जाणीव दिसून येत होती; पण ते हतबल होते.

श्रीधरन सातत्याने नासाशी संपर्क ठेवून होतेच. त्यांना नासाच्या अंतरिक्ष प्रमुखांचा संदेश आला की अमेरिकेच्या अंतराळातील स्थानकाने अंतरिक्षातील एका अमेरिकन व एका रशियन उपग्रहांची कक्षा बदलून पृथ्वीला तो ओझरता स्पर्श करून जातील असा प्रयत्न करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पृथ्वीच्या कक्षेत मोठी हालचाल घडवून आणण्यासाठी एक विशिष्ट अस्त्र वापरण्यात आले आहे. त्याचा परिणाम होऊन पृथ्वीला पुन्हा फिरण्याची गती प्राप्त करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे व पृथ्वी पुन: स्वत:भोवती फिरण्यास सुरुवात झाली आहे. गती कमी आहे पण ती हळूहळू वाढेल असे अनुमान आहे पण लवकरच पूर्वस्थिती निर्माण होईल.

ते भयानक दोन तास संपले. पण अंध:कार कमी झाला नाही नंतर हळूहळू आकाशात पहाट प्रकाश दिसू लागला. पृथ्वीवरचे संगीत पुन: सुरू झाले. अपरिमित हानी झाली. नंतर सर्व जगाने सुस्कारा सोडला. पण विज्ञानाची मर्यादा स्पष्ट झाली. निसर्ग फार मोठा आहे व तो कोणताही चमत्कार घडवू शकतो. हे सिद्ध झाले.

**- जयंत मराठे**
गायत्री हाईट्स, प्लॅट नं. २१, पर्वती,
टी.व्ही.एस शोरुमच्या बाजूला,
फोन - ०२०-२४४४१११७

## हितगुजला वर्गणी देणाऱ्या कुलबांधवांची नावे

श्रीरंग रामचंद्र मराठे, माटुंगा, श्री. वामन गणेश मराठे, पुणे, श्री. रमाकांत माधव विद्वांस, माटुंगा, डॉ. सौ. वसुधा आपटे, अंधेरी, श्रीमती राधा श्रीकृष्ण ठाकूर, अंधेरी, श्री. चिंतामणी हरि मराठे, ठाणे, श्री. रमेश माधव मराठे, मुलुंड, श्री. अमित अरुण मराठे, सांगली, श्रीनिवास प्रभाकर मराठे, अंधेरी (प.), श्री. सुरेश राजाराम मराठे,हरकुळ कणकवली, उज्ज्वला मुकुंद बापट, कल्याण, सौ. शुभा सुहास सोहनी, रत्नागिरी, श्री. नितीन शंकर मराठे, नाशिक, श्री. अशोक नारायण खांबेटे, माहीम, श्री. वसंत रामचंद्र मराठे, विलेपार्ले, सौ. मंगला दत्तात्रेय मराठे, भाईंदर, श्री. विश्वनाथ द. मराठे, पाळी (गोवा), श्री. रविंद्र दिनकर मराठे, मालाड, श्री. सुरेश नारायण विद्वांस, चौल (अलिबाग), श्री. चिंतामणी त्र्यंबक मराठे, कळवा, श्री. चंद्रशेखर चिंतामणी मराठे, पनवेल, श्री. जयप्रकाश चिंतामणी मराठे, कोथरूड, पुणे, सौ. सुधा शरदचंद्र साठे, गोरेगाव (रायगड), सौ. शुभदा दिलीप जोशी, गोरेगाव (रायगड), सौ. वर्षा नंदलाल गोडबोले, पुणे, श्री. प्रमोद त्र्यंबक खांबेटे, मुलुंड, श्री. उदय दत्तात्रेय मराठे, मुलुंड, श्री. श्रीकांत मराठे, बोरिवली, श्री. अनिल वसंत मराठे, वरसोली-अलिबाग, श्री. विनायक वसंत मराठे, वरसोली-अलिबाग, श्री. अच्युत वासुदेव खांबेटे, चिंचवड (पुणे), सौ. स्मिता वामन चक्रदेव, अंधेरी, श्रीमती सुहासिनी नारायण मराठे, कल्याण, श्री. विष्णू गोविंद मराठे, दादर, श्री. आनंद अशोक मराठे, कल्याण. श्री. विष्णू गोविंद मराठे, दादर, श्री. आनंद अशोक मराठे, सांगली, श्री. काशिनाथ मराठे, म्हापसा-गोवा, श्री. विजय मराठे, इंदौर (म.प्र.), श्री. शरद के. मराठे, डोंबिवली, श्री. प्रभाकर सदाशिव विद्वांस, ठाणे, श्री. प्रभाकर महादेव मराठे, आंबेजोगाई, श्री. माधव यशवंत मराठे, वेंगुर्ला, श्री. प्रमोद रामचंद्र विद्वांस, गुळसुंदे (रायगड), श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे, ढवळी-गोवा, श्री. वसंत बाळकृष्ण मराठे, सोलापूर, श्री. अनंत वसंत मराठे, अंधेरी, सौ. दीप्ती अमोल गोडबोले, मुलुंड, सौ. केतकी अभिजित दामले, पाषण, पुणे, श्री. बाळकृष्ण सखाराम मराठे, चिंचवड, श्री. शंकर केशव मराठे, भंडारा, श्री. पुरुषोत्तम महादेव मराठे, अंधेरी, श्री. आनंद पुरुषोत्तम मराठे, अंधेरी, श्री. सदानंद तथा भाऊ मराठे, शिवाजीपार्क, दादर, श्री. दिनकर शंकर मराठे, ठाकूरद्वार, सौ. अमृता अनुप मराठे, पुणे, श्री. अरविंद गोविंदराव मराठे, मिरज, श्री. प्रदीप य. मराठे, गिरगाव, श्री. ना. ज. जाईल, ठाणे, श्री. विष्णुमूर्ती एस. मराठे, डोंबिवली, श्री. माधव मधुकर मराठे, डोंबिवली, श्री. मुकुल माधव मराठे, भोपाळ, संध्या सदानंद खांबेटे, ठाणे, डॉ. सौ. ऋचा राजेश शिदोरे, गोरेगाव (मुंबई)

## व्रतबंध

चि. मोहीतचे मौजीबंधन दिनांक १२.५.२०१३ ला पु. ल. देशपांडे हॉल, विलेपार्ले येथे थाटामाटात संपन्न झाले. चि. मोहीत हा डॉ. सौ. ऋचा आणि श्री. राजेश शिदोरे यांचा सुपुत्र असून सौ. स्मिता व श्री. वामन चक्रदेव (पृ. २६७) यांचा नातू आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. मोहीतला अनेकोत्तम शुभाशिर्वाद आणि शुभेच्छा. विशेष लक्षणीय गोष्ट म्हणजे त्याच्या आईने डॉ. सौ ऋचाने (मराठ्यांची माहेरवाशीण) या मुंजीप्रीत्यर्थ 'हितगुज'ला एक सहस्त्र (१०००/-) रुपये देणगी म्हणून दिले आहेत. त्याबद्दल डॉ. सौ. ऋचाला धन्यवाद आणि आभार

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपणास व मराठे प्रतिष्ठानच्या सर्व सभासदांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन पत्रास प्रारंभ करीत आहे.

डिसेंबर २०१२ चा 'हितगुजचा अंक' मिळाला. मुखपृष्ठावर हितगुजच्या पहिल्या अंकापासून आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा वाचण्यास मिळाला. एखाद्या संस्थेचा अशा प्रकारचा अंक सातत्याने व अधिकाधिक दर्जेदार निघणे हे खरोखर कौतुकास्पद आहे. त्याचे श्रेय प्रथम संपादक श्री. लक्ष्मणरावांना व आता आपणास आहे. श्री. खांबेटे हे तर सतत सर्व उपक्रमांत आहेतच. त्यांचेही भरपूर योगदान असते.

प्रथम आजीव वर्गणी रु.१०० घेऊन चालू केलेले हितगुज आज आहे त्या स्वरूपात चालू ठेवण्यासाठी १२ ते १५ लाख रु. कायम ठेव असणे जरूर आहे हे पटण्याजोगे आहे. त्यासाठी आपण पाठविलेला सहमतीचा फॉर्म १ सोबत भरून पाठवीत आहे. व त्या बरोबरच रू.२०००चा दिनांक ७-१-२०१३ चा एच.डी.एफसी बँकेचा चेक क्र. ५४०४८७ दिनांक ७-१-२०१३ जोडला आहे.

प्रत्येकाने हितगुजसाठी आजीवन वर्गणी रु. १००० द्यावी या आवाहनानुसार मी १३-८-२००९ रोजी रु. १००० वर्गणी दिली आहे. सांगली, मिरज विश्रामबाग येथील हितगुज वर्गणीदारांची मीटिंग दर ३ महिन्याने घेण्याचा उपक्रम त्या मी वेळी सुरू केला होता. त्या वेळी नऊ सभासदांनी प्रत्येकी रु. १००० दिले होते. अशा तीन मीटिंग झाल्या. नंतर त्यात खंड पडला. त्या आधी रु.१०० द्यावेत या आवाहनानुसार मी रु.१००, २५-५-२००९ ला पाठविले आहेत.

आपल्या अंकास रु. ७ एवढे पोस्टेज लावावे लागते. हा पोस्टाचा खर्च फार होतो. बरीच मासिके, नियतकालिके रजि. न्यूज पेपर म्हणून अगदी कमी पोस्टेजमध्ये येतात. त्याप्रमाणे आपल्यास करता येईल का पहावे. अर्थात प्रतिष्ठानने याचा विचार केला असणारच. मला वाटते असे करण्यात फक्त सभासदांकरिता हे वाक्य आड येत असावे. त्यावर उपाय सापडतो का पाहावा.

'नाते औषधांशी' ही कविता आवडल्याचे काहींनी फोनद्वारे कळवले होते त्यांचा मी आभारी आहे.

आपल्या वर्गणी देण्याच्या आवाहनास चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

**-श्री. वि. म. मराठे (पृ. २३५),** पद्मश्री, महाराष्ट्र बँकेजवळ, विश्रामबाग, सांगली ४१६४१५

### पुस्तक परिचय

### श्री. अ. द. मराठे लिखित 'मराठी भाषेतील असभ्य म्हणी आणि वाक्प्रचार'

काही शब्द असे असतात, की ते चारचौघात उच्चारायलाही लाज वाटावी. मग असे शब्द वापरून तयार केलेल्या म्हणी आणि वाक्प्रचार वापरणं तर लांबच! पण अनेकदा खासगीत किंवा काही समाजांमध्ये सरार्स सर्वांसमोर अशी वाक्ये वापरली जातात. अशा असभ्य समजल्या जाणाऱ्या म्हणी आणि वाक्प्रचारां.ची रंजक माहिती अ. द. मराठे यांनी या पुस्तकात करून दिली आहे. हा एक विस्तृत अभ्यास आहे. या अभ्यासाचा निष्कर्षही त्यांनी काढला आहे. ते सांगतात, 'मराठीत साहित्यासंबंधी प्रचलित असलेले सद्गिरूची, सुसंस्कृत, ग्राम्यपणा, अभद्र या शब्दांचे अर्थ व्यक्तिसापेक्ष आहेत. सापेक्ष असणाऱ्या संकल्पनांची अशी उच्चनीच वर्गवारी करणे मला अयोग्य वाटते. लोकजीवनाचे नैसर्गिक प्रकटीकरण करणाऱ्या म्हणी आणि वाक्प्रचारांचा हा आगळावेगळा कोश आहे.

साभार : महाराष्ट्र टाईम्स, दि. २३ एप्रिल

### मानसन्मान



सदानंद ऊर्फ श्री. नंदकुमार मराठे, कोल्हापूर यांची ब्राह्मण सभा करवीरच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे ब्राह्मणसभा करवीर (मंगलधाम) या संस्थेचे हे हीरक महोत्सवी वर्ष सुरू आहे. मराठे प्रतिष्ठानद्वारा सदानंद ऊर्फ श्री. नंदकुमार मराठे यांचे हार्दिक अभिनंदन!

## 'सुंदर कीर्तन महोत्सव'

कीर्तन शिरोमणी वै. ह. भ. प. सुंदरबुवा मराठे, (सुधागड-पाली) यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ शुक्रवार दिनांक २५ जानेवारी ते रविवार दिनांक २७ जानेवारी २०१३ या दिवसात श्री गजानन महाराज संस्थान मंदीर, रामवाडी, पेण येथे सुंदर कीर्तन महोत्सव आयोजित केला होता.

# १० वी, १२ वी, पदविका, पदवी व अन्य परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

गुणवत्ता पारितोषिके २०११-२०१२ साठी ३० जुलै पूर्वी अर्ज पाठवावे.

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक-स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. अभ्यासेत्तर क्षेत्रात किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पारितोषिकेही देण्यात येतात :

**१. कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिके** : इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७ वी.) या परीक्षात मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या प्रत्येकी रु. २५०/-

**२. सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिके :** इ. १० वीच्या परीक्षेत १००मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी रु. १००/-

**३. प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक** : रु. ५००/- पात्रतेचे निकष :

अ. तांत्रिक विषय देऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण

ब. १०वीला तांत्रिक विषय नसले तरी १० वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कॉम्प्युटर इंजिनियरिंग यासारख्या आभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वीच्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/ विद्यार्थिनी

क. मात्र १० वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यात यावा.

**४. शालिनी धुंडिराज प्रायोजित वैदिक शिक्षण अथवा हिंदूधर्माचा प्रचार यासाठी** - वार्षिक पुरस्कार रु. १०००/-

**५. शैक्षणिक कर्ज -**

विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिअरिंग शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज (रु.३०,०००पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यासाठीचे अर्ज ३० जुलै २०१३ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे. अर्ज फक्त २०१२-२०१३ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत अर्जाला जोडून पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षीस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीही खास निधीतून (विशिष्ट हेतू निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना साहाय्यासाठीही कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

**: अर्ज पाठविण्याचा पत्ता :**

**श्री. हेमंत अरुण मराठे,** कार्यवाह मराठे प्रतिष्ठान

बी-१०२, शांतीनाथ ॲव्हेन्यू, चक्रधर नगर, नालासोपारा (प.) - ४०१२०३ जि. ठाणे, मोबाईल : ९८२२८४७१२०



Marathe Pratishthan

# मेसर्स. वामन शंकर मराठे प्रा. लि.

अभिवादन, १ला मजला, शिवाजी पथ, ठाणे ४००६०२
फोन नं. : ०२२-२५४२३३३७/२५४२२४९४

## वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१,४ पूजाविहार को. ऑप. हौ. सो.,
राम मारुती रोड, ठाणे (प.)- ४०० ६०२
फोन नं. : ०२२-२५४२४७८६/२५५५५५५५

## वामन शंकर मराठे ज्वेलर्स

१, अंकिता, नवघर रोड, मुलुंड जिमखान्यासमोर,
मुलुंड (पू.), मुंबई - ४०० ०८१.
फोन नं. : ०२२-२१६३५७६७

E-mail : vsmarathejewellers@gmail.com
Website : www.vsmarathe.com

BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ◉ वेबसाईट : www.marathepratishthan.org

Marathe Pratishthan